# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

**स.नं.२७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग,**

**पुणे ४११ ०१६**

## ५३ वा वार्षिक अहवाल

## (२०१५-२०१६)

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

# ५३ वा वार्षिक अहवाल
# (२०१५-२०१६)

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | संचालक मंडळाची यादी सन २०१५-२०१६ करीता | ..... | ५ |
| २ | स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना | ..... | ७ |
| ३ | संचालकांचा अहवाल | ..... | ८ |
| ४ | लेखापरिक्षकांचा अहवाल | ..... | ११ |
| ५ | ताळेबंद | ..... | २० |
| ६ | नफा तोटापत्रक | ..... | २१ |
| ७ | लेख्यांचा भाग असलेल्या वित्तीय टिपा आणि लेख्यांची महत्वाची धोरणे | ..... | ४१ |
| ८ | भारताचे मा.नियंत्रक तथा महालेखा परिक्षक यांचे अभिप्राय | ..... | ४४ |


----*----

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

## सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचा अहवाल विधान मंडळाला सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे:-

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ महाराष्ट्र कंपनी कायदा १९५६ अन्वये नोंदणीकृत असून महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम आहे. कंपनी कायदा २०१३ चे कलम १२९ व ९६ अन्वये महामंडळाच्या दि. ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचे लेखे दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ पूर्वी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये स्विकृत करुन घेणे आवश्यक आहे.

तथापि भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक नवी दिल्ली यांचेकडील आदेश क्र. सिएव्ही/सीओवाय/महाराष्ट्र १ एमएचफार्म (१) १०४७ दिनांक ३१-०७-२०१५ च्या आदेशानुसार मे.एन.पी.एस.आर.आणि असोसिएटस्, सनदी लेखापाल यांची संविधानिक लेखा परिक्षक म्हणून नेमणूक झाली. दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाचे लेखे दिनांक ०७-०३-२०१७ रोजीचे परिपत्रकीय ठरावाद्वारे संचालक मंडळाने स्विकृत केले. सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचे संविधानिक लेखापरिक्षण दिनांक २१-०३-२०१७ रोजी पूर्ण झाले. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १४३ (६) (ब) अन्वये भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे ना पुर्नतपासणी प्रमाणपत्र प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षण) यांचे कार्यालयाचे पत्र क्र. एजी/लेप-३/वालेप खंड-१/फार्मिंग/२०१५-१६/८५३/(दि.०७-०४-२०१७) दिनांक १७-०४-२०१७ रोजी प्राप्त झाले. सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचे लेखे दिनांक ३०-०५-२०१७ रोजी झालेल्या ५३ व्या स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये स्विकृत करण्यात आले. त्यानंतर वार्षिक अहवाल छपाई करुन शासनास सादर करण्यात आला.

वरील कारणांमुळे सन २०१५-२०१६ या वर्षाचे लेखे विधान मंडळाला सादर करण्यास विलंब झाला.

**----*----**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

**सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाला झालेल्या नफा संबंधीचा तपशील.**

**सन २०१५-२०१६ या चालू वर्षात महामंडळाने शासकीय कर्जावरील व्याज, घसारा व आयकर पूर्व नफा रु.१३८५.२५ लाख मिळवला असून शासकीय कर्जावरील व्याज, घसारा व आयकर नंतर नफा रु. ४९.७२ लाख झाला आहे.**

३१ मार्च २०१५ रोजी संचित तोटा रु. २३५.३८ कोटी इतका होता आणि मागील वर्षाची समायोजने विचारांत घेता **३१ मार्च २०१६ रोजी संचित तोटा रु.२३४.८८ कोटी आहे.**

**खर्च :-**

सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षामधील खर्च तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रुपये लाखांत)

| अ. क. | तपशील | २०१४-२०१५ रुपये | २०१५-२०१६ रुपये |
|---|---|---|---|
| १ | वेतन व मजूरी | ७५३.८३ | ७२८.४६ |
| २ | दुरुस्ती व निगा | १०.१९ | १०.४५ |
| ३ | व्यवस्थापन खर्च | ९६.१९ | ८९.१५ |
| ४ | संचालकांचे परिश्रमिक आणि खर्च | २२.३८ | २४.६४ |
| ५ | **व्याज** | **११०७.७२** | **१११४.२९** |
| ६ | व्यवसायातील व प्रक्रियेतील साठयातील घट | ३९.२२ | २१.२२ |
| ७ | मत्तावरील घसारा | २०.६६ | १३.०४ |
| ८ | आयकरासाठी तरतूद | ४०.५२ | ४२.९८ |
| | **एकूण :-** | **२०९०.७१** | **२०४४.२३** |
| ९ | मागील वर्षाचे संबंधित खर्च | २१००.२८ | १६५.२३ |
| | **एकूण** | **४१९०.९९** | **२२०९.४६** |

**उत्पन्न :-**

सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षातील तुलनात्मकदृष्टया महसूली जमा खालीलप्रमाणे आहे -

(रुपये लाखात)

| अ. क्र. | तपशील | २०१४-२०१५ रुपये | २०१५-२०१६ रुपये |
|---|---|---|---|
| १ | **व्यवहारातून मिळालेले उत्पन्न** | | |
| | अ. संयुक्त शेती पासून | ५८३.८२ | १३८७.७९ |
| | ब. वृक्षशेती व फळे पासून | ३९.२२ | २७.४१ |
| २ | **इतर उत्पन्न (व्याज/वापरमूल्य सह)** | ८४४.८७ | ८४३.९८ |
| | **एकूण:-** | १४६७.९१ | २२५९.१८ |
| ३ | **नफा/(तोटा)** | **(२७२३.०८)** | **४९.७२** |
| ४ | **संचित तोटा** | **२३५,३७.८४** | **२३४,८८.१२** |

**----*----**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**

## संचालक मंडळ २०१५-२०१६

**१ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ पर्यंत**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **मा. ना.श्री. एकनाथराव गणपतराव खडसे**<br>मंत्री महोदय (महसूल), महाराष्ट्र राज्य.<br>(ऑक्टोबर २०१४ ते ०३ -०६- २०१६) | ..... | **अध्यक्ष** |
| | **मा. ना.श्री. चंद्रकांत (दादा) पाटील**<br>मंत्री महोदय (महसूल), महाराष्ट्र राज्य.<br>(दि.०८ -०७-२०१६ पासून) | ..... | **अध्यक्ष** |
| २ | **मा. ना.श्री. संजय धुलीचंद राठोड**<br>राज्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य.<br>(दि.०५ -१२- २०१४ पासून) | ..... | **उपाध्यक्ष** |
| ३ | **मा. श्री. मनुकूमार श्रीवास्तव, भा.प्र.से.**<br>प्रधान सचिव, (महसूल), महाराष्ट्र राज्य.<br>(दि.०६-०१-२०१५ पासून) | ..... | **संचालक** |
| ४ | **मा. श्री. शिवाजी मारुती उपासे, भा.प्र.से.**<br>सचिव (लाभक्षेत्र विकास) पाटबंधारे<br>(दि.०१-०७-२०१५ पासून) | ..... | **संचालक** |
| ५ | **मा. डॉ. विपीन शर्मा, भा.प्र.से.**<br>साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य.<br>(दि.०५-०९-२०१४ पासून) | ..... | **संचालक** |
| ६ | **मुख्य अभियंता, पाटबंधारे नाशिक.**<br>**१.मा.श्री. जी. एस. लोखंडे (दि. ३०-११-२०१३ ते ३१-०७-२०१५)**<br>**२.मा.श्री. म. वि. पोफळे** (अति.कार्य.) (दि.३१-०७-१५ ते ०३-०८-१५)<br>**३.मा.श्री. आर. आर. पवार** (अति.कार्य.) (दि.०३-०८-१५ ते ०१-०९-१५)<br>**४.मा.श्री. ह. म. शिंदे (दि.०१-०९-२०१५ ते २८-०३-२०१६)**<br>**५.मा.श्री. रा. मू. मोरे** (अति.कार्य.) (दि.२८-०३-२०१६ ते ०१-०४-२०१६)<br>**६.मा.श्री. वि. जि. राजपूत** (अति.कार्य.) (दि.०१-०४-२०१४ ते ११-०९-२०१६)<br>**७.मा.श्री. सु. शं. वाघमारे (दि.१२-०९-२०१६ पासून))** | ..... | **संचालक** |
| ७ | **मा.श्री. यु.के. अग्रवाल, भा.व.से. (दि.०१-०१-२०१० ते ११-०९-२०१६)**<br>व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित | ..... | **संचालक** |
| | **मा.श्री. आर. बी. भागडे, भा.प्र.से.(दि.१२-०९-२०१६ पासून)**<br>व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित | ..... | **संचालक** |

**----*----**

**महामंडळाच्या सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद, नफा - तोटा पत्रक व वार्षिक अहवाल खालील संचालकांनी दिनांक ०७-०३-२०१७ चे परिपत्रकीय ठरावाद्वारे संमत केला.**

| | | | |
|---|---|---|---|
| **१** | **मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील**<br>**मंत्री महोदय (महसूल),महाराष्ट्र राज्य.** | **.....** | **अध्यक्ष** |
| **२** | **मा. ना. श्री. संजय धुलीचंद राठोड**<br>**राज्यमंत्री महोदय (महसूल),महाराष्ट्र राज्य.** | **.....** | **उपाध्यक्ष** |
| **३** | **मा.श्री. मनुकूमार श्रीवास्तव, भा.प्र.से.**<br>**प्रधान सचिव, (महसूल), महाराष्ट्र राज्य.** | **.....** | **संचालक** |
| **४** | **मा.डॉ. विपीन शर्मा, भा.प्र.से.**<br>**साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य.** | **.....** | **संचालक** |
| **५** | **मा. श्री. सुभाष शंकर वाघमारे**<br>**मुख्य अभियंता, पाटबंधारे, नाशिक** | **.....** | **संचालक** |
| **६** | **मा. श्री. आर. बी. भागडे, भा.प्र.से.**<br>**व्यवस्थापकीय संचालक**<br>**महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित** | **.....** | **संचालक** |
| **७** | **मा.श्री. जी. आर. खरात**<br>**महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित** | **.....** | **सचिव** |

**नोंदलेले कार्यालय :**
स.नं. २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६
फोन नं. २५६५०५५१, २५६५०५५५, २५६५९५५३
फॅक्स नं. २५६५९८४३

**लेखापरिक्षक:**
एन पी एस आर आणि असोसिएटस
सनदी लेखापाल

**----*----**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)**


**नोंदलेले कार्यालय .**
**स.नं. २७०, भांबुर्डा,**
**सेनापती बापट मार्ग,**
**पुणे - ४११ ०१६ .**


क्रमांक : सचिव/२०१६/५३वी स्थगित वा.स.स./२०१७/१८४ दिनांक ०९/०५/२०१७

**५३ वी स्थगित वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या सभासदांची स्थगित झालेली ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक ३० मे २०१७ रोजी दुपारी १२.०० वाजतां** महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या सर्व्हे नंबर २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ येथील व्यवस्थापकीय संचालक यांच्या दालनामध्ये स्थगित झालेले पुढील कामकाज पूर्ण करण्यासाठी भरविण्यात येईल.

१. दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या महामंडळाच्या वर्षासंबंधीच्या संचालकांचा अहवाल व लेखा परिक्षकांचा अहवाल आणि कंपनीच्या हिशोबाचे विवरण पत्र आणि ताळेबंद विचारात घेणे व स्विकृत करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन
सही/-
( गुलाबरात खरात)
कंपनी सचिव.

स्थळः पुणे
दिनांकः ०८/०५/२०१७

**टीपः** सभेस उपस्थित राहाणा-या व मतदान करण्याचा हक्क असलेल्या सभसदाला स्वतःऐवजी उपस्थित राहण्यासाठी प्रतिनिधी नेमण्याचा हक्क आहे. हा प्रतिनिधी सभासद असण्याची आवश्यकता नाही.

प्रति,
महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, २०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६ चे भागधारक व कंपनी लेखापरिक्षक यांस.

# **महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे - ४११ ०१६.**

**(महाराष्ट्र शासचाना अंगिकृत व्यवसाय)**

## **संचालकांचा अहवाल २०१५-२०१६**

**प्रति,**

**सदस्य यास,**

**सन २०१५-२०१६ या वर्षातील महामंडळाच्या कामकाजाबद्दलचा हा ५३वा वार्षिक अहवाल सादर करतांना आपल्या संचालकांना अतिशय आनंद होत आहे. या अहवालासोबत या कालावधीकरीता लेखा परिक्षकांचा अहवाल व भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांची विवरण पत्रेही सादर करण्यात आली आहेत.**

**२. वार्षिक सर्वसाधारण सभा :-**

महामंडळाच्या ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या सन २०१५-२०१६ या वर्षाचा नफा-तोटा पत्रक व ताळेबंद त्यावरील लेखापरिक्षकांचा अहवाल व भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या अभिप्रायासह दिनांक ३०/९/२०१६ किंवा त्यापूर्वी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये स्विकृतीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे कार्यालय नवी दिल्ली यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक ३१-०७-२०१५ द्वारे सन २०१५-२०१६ या वर्षाचे लेखे तपासणीसाठी **मे.एन.पी.एस.आर.आणि असोसिएटस् , सनदी लेखापाल, पुणे** यांचा लेखा परिक्षक म्हणून नेमणुकीचा आदेश काढला आहे.

सन २०१५-२०१६ या वर्षाचे लेखा परिक्षण झालेले लेखे भागधारकांच्या स्विकृतीसाठी सादर केले आहेत.

**३. भाग भांडवल :-**

महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल चालू वर्षी (३१ मार्च २०१६ अखेर) रुपये ३ कोटी इतके राहीले आणि अभिदत्त व भरणा केनेले भांडवल रुपये २.७५ कोटी इतके राहिले.

**वित्तीय परिणाम:**

| | | २०१५-२०१६ (रुपये लाखांत) | २०१४-२०१५ (रुपये लाखांत) |
|---|---|---|---|
| १ | संयुक्त शेती, वृक्ष शेती आणि फलोद्यान (निव्वळ निधी) | **१४,१५.१९** | **६,२३.०४** |
| २ | इतर जमा | **८,४३.९८** | **८,४४.८७** |
| ३ | घसारा, व्याज, कर तरतूदी व मागील वर्षाचे खर्चा पूर्वी येणारा स्थूल नफा/(तोटा) | **१३,८५.२५** | **५,४६.११** |
| ४ | घसारा, व्याज, कर तरतूदी व मागील वर्षाचे खर्चा नंतर येणारा नफा/ (तोटा) | **४९.७२** | **(२७,२३.०८)** |
| ५ | सुचविलेला लाभांश | **०.००** | **०.००** |
| ६ | वर्ग केलेली निव्वळ शिल्लक | **(-)२३४,८८.१२** | **(-)२३५,३७.८४** |
| ७ | गुंतविलेले भांडवल | **(-) ११२,३९.०१** | **(-) १२३,९४.००** |
| ८ | अभिदत्त भरणा केलेले भांडवल | **२,७५.००** | **२,७५.००** |
| **९** | **निव्वळ मूल्य** | **(-) २३२,१३.१२** | **(-) २३२,६२.८४** |

**४. बोनस :-**

महामंडळाने सन २०१५-२०१६ या वर्षामधील लेख्यांमध्ये ८.३३ % बोनसच्या रकमेची तरतूद केलेली आहे.

**५. पिक योजना :-**

सन २०१५-२०१६ मध्ये महामंडळाने संयुक्त शेती पिक योजनेनूसार एकूण २०,०५० हजार एकर क्षेत्रावर संयुक्त शेती राबविलेली आहे. आणि त्यापासून महामंडळास रक्कम रु. १३८७.७९ लाख उत्पन्न मिळाले आहे.

**उत्पन्न**

| अ. नं. | पिकाचे नांव | क्षेत्र (एकरामध्ये) | | उत्पन्न (रुपये लाखांत) | |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१५-२०१६ | २०१४-२०१५ | २०१५-२०१६ | २०१४-२०१५ |
| १ | वृक्ष शेती व फलोद्यान | ९,२१६ | ९,२१६ | २७.४० | ३९.२२ |

**६. कर्मचारी वर्ग आणि औद्योगिक संबंध :-**

अहवाल वर्षी (३१ मार्च २०१६ अखेर) महामंडळा मध्ये एकूण १६९ कायम कर्मचारी वर्ग कार्यरत होता. व्यवस्थापन व कामगार यांच्यातील सर्वसाधारण संबंध सलोख्याचे राहिले. कांही मळयांवरील कामगारांनी किरकोळ स्वरुपाचे आंदोलनाचा मार्ग स्विकारला परंतु अशी आंदोलने फार थोडी होती.

**७. संचालक मंडळाच्या बैठका :-**

अहवाल वर्षी संचालक मंडळाची दिनांक ०३/०२/२०१६ रोजी एक बैठक झाली.

**८. संचालकांची जबाबदारी :-**

कंपनी कायदा २०१३ चे कलम १३४ (५) मधील अनुसरून कंपनीचे अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे आधारावर संचालक मंडळ त्यांची जबाबदारी सादर करीत आहे :-

अ) वार्षिक लेखे हे "लेखांचे नियम " नुसार तयार केलेले असून त्यामध्ये तफावत नाही.

ब) संविधानिक लेखा परिक्षक यांचे सल्ल्यानुसार "लेख्यांची धोरणे" विचारात घेतलेली असून कायमपणे वापरलेली आहेत. घेतलेले निर्णय आणि इतर बाबी योग्य असून आर्थिक वर्षाअखेरीचे म्हणजेच दिनांक ३१ मार्च २०१६ अखेरचे कंपनीचे कामकाज आणि नफा - तोटा पत्रक सत्य आणि योग्य दर्शवितात.

क) कंपनीचे मालमत्तेची सुरक्षितता आणि इतर अनियमितता, फसवणूक निदर्शनास येऊन त्यास प्रतिबंध होईल अशा पध्दतीने कंपनी कायदा १९५६ चे तरतुदीस अनुसरुन लेख्यांच्या नोंदी ठेवलेल्या आहेत. त्याबाबत त्यांचे मतानुसार त्यांनी योग्य आणि पुरेशी काळजी घेतली आहे.

ड) कंपनीचे कामकाज चालू राहील या तत्वावर वार्षिक लेखे तयार केले आहेत.

इ) सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता होईल अशी योग्य नियंत्रण पध्दत राबविली असून सदर नियंत्रण पुरेसे व प्रभावी आहे.

**९. कृतज्ञता :-**

अहवाल वर्षी महामंडळाच्या कर्मचा-यांनी केलेल्या चांगल्या कामगिरीबद्दल संचालक समाधान व्यक्त करीत आहेत. महामंडळाच्या कामकाजाच्या संदर्भात राज्य शासनाच्या विविध विभागांनी दाखविलेल्या सहकार्याबद्दल संचालक कृतज्ञ आहेत. महालेखाकार (वाणिज्यिक लेखापरिक्षण) मुंबई आणि संविधानिक लेखा परिक्षक मे. एन.पी.एस.आर.आणि असोसिएटस्, सनदी लेखापाल, पुणे यांनी महामंडळास वेळोवेळी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल महामंडळ त्यांचे आभारी आहे.

**संचालक मंडळाकरीता व त्यांच्यावतीने.**

**अध्यक्ष**

# Annexure

**कंपनी कायदा १९५६ मधील कलम २१७ (२अ) अन्वये आवश्यक तक्ता**

सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात आर्थिक मोबदला रुपये ६०लाख किंवा अधिक असणा-या कर्मचा-यांची यादी.

**निरंक.**

**----*----**

**महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे - ४११०१६**

**३१ मार्च २०१६ ला असल्याप्रमाणे ताळेबंद**

**आणि**

**३१ मार्च २०१६ ला संपलेल्या वर्षाचा नफा तोटा लेखा**

**सोबत**

**वित्तीय टिपा ३१ मार्च २०१६ ला असलेल्या**
**लेख्यांना जोडलेल्या व त्याचा भाग असलेल्या**

**आणि**

**लेखापरिक्षकांचा अहवाल**

**एन.पी.एस.आर. आणि असोसिएटस्**
**सनदी लेखापाल,**
**कार्यालय नं.१३ ते एम एस आर स्केअर,**
**चिंचवड रेल्वे स्टेशन मागे,**
**चिंचवड, पुणे - ४११ ०३३.**
**दूरध्वनी नं. ०२०-२७५१५५७५/२७५१५५८५**
**ई-मेल - nclahoti@yahoo.co.in**

## लेखापरिक्षकाचा स्वत:त्रपणे अहवाल.

**प्रति,**
**सभासद, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित**

### वित्तीय तक्त्यांवरील अहवाल

आम्ही महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, (कंपनी) यांचे ३१ मार्च २०१६ रोजीचे ताळेबंद आणि ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षाचे नफा-तोटा पत्रकाची तक्ते आणि सारांशातील लेख्यांची महत्वपुर्ण धोरणे व स्पष्ट करणारी इतर माहिती यांचे लेखा परिक्षण केलेले आहे.

### आर्थिक तक्त्यांबाबतची व्यवस्थापनाची जबाबदारी :

कंपनी कायदा, २०१३ ("द ॲक्ट") चे कलम १३४ (५) मध्ये नमूद केलेप्रमाणे सदर वित्तीय तक्ते हे आर्थिक आढावा, आर्थिक परिस्थीती बाबत सत्यता आणि योग्यता दर्शविणारी तक्ते आणि भारतामध्ये सर्वसाधारण स्विकारलेली लेख्यांची तत्वे यासह या कायदा मधील कलम १३३ मधील कंपनीज (अकौंटस्) नियम, २०१४ मधील नियम ७ च्या नूसार कंपनीचा रोखीचा प्रवाह तक्ता तयार करण्याची जबाबदारी ही कंपनीच्या व्यवस्थापनाची आणि संचालक मंडळाची आहे. याशिवाय या जबाबदारीमध्ये कायद्यातील तरतुदीस अनुसरुन कंपनीची मालमत्ता सुरक्षीत असणे करीता आवश्यक तेवढा लेख्यांचा तपशील ठेवणे आणि इतर अनियमितता आणि अफरातफर नजरेस येईल आणि त्याला आळा बसेल अशी लेख्यांची यथायोग्य धोरणे अवलंबीणे जेणे करुन परिणामी निर्णय आणि प्रमाणितता हि योग्य, भक्कम आणि चाकोरीत असतील. तसेच लेख्यांची माहिती हि अचूक आणि परिपूर्ण खात्रीशीर परिणामकारक असणे करीता अंतर्गत आर्थिक नियंत्रणाची अंमलबजावणी आणि पुर्तता करणेची जेणे करुन संबंधीत आर्थिक तक्ते तयार करुन सादर केलेली हि अफरातफर किंवा चुकीमुळे अयोग्य दाखविली जात नाहीत ना तसेच खरे आणि योग्य दाखविले जातात याचाही समावेश होतो.

### लेखापरिक्षकांची जबाबदारी :

ज्या आर्थिक तक्त्यांचे आधारावर आमचे लेखापरिक्षण आहे त्यावर आमचे मत दर्शविणे हि आमची जबाबदारी आहे. भारताची कायद्यातील तरतूदी आणि त्यामधील नियमानुसार लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट करावयाचे आवश्यक असणा-या बाबी, लेख्यांची आणि लेखापरिक्षणाची प्रमाणिकरण, कायद्यातील तरतुदी इत्यादि या विचारांत घेतलेल्या आहेत. कायद्यातील कलम १४३ (१०) मध्ये नमुद केलेल्या लेखापरिक्षणाची प्रमाणिकरण यास अनुसरुन आम्ही लेखापरिक्षण केले आहे. आम्ही नितीशास्त्राची पूर्तता करुन आर्थिक तक्ते हे अवाजवी चुकीचे दर्शवित नाहीत याची पुरेशी खात्री लेखापरिक्षणातून मिळणेकरीता, त्यानुसार नियोजन करुन लेखापरिक्षण करुन लेखापरिक्षण करावे अशी अपेक्षा या प्रमाणीकरणास अपेक्षीत आहे.

आर्थिक तक्त्यातील रक्कम आणि प्रगटीकरण बाबतचे पुरावे मिळविता येतील अशी पध्दत लेखापरिक्षणात अंतर्भूत करण्यात आली आहे. लेखापरिक्षणाची निवड केलेली पध्दत हि लेखापरिक्षकांचे निर्णय तसेच फसवणूक किंवा चूक यामुळे आर्थिक तक्ते चुकीचे विधान दर्शवित नाहीत ना या बाबतची वस्तुस्थिती पडताळणीतले धोरणे विचारात घेऊन त्यावर आधारलेली आहे. वित्तीय तक्ते तयार करतांना आणि त्याची सत्यता दर्शवितांना यासंबंधी कंपनीचे असलेले अंतर्गत वित्तीय नियंत्रण पध्दत व पडताळणीतील धोके विचारात घेऊन त्यानुसार लेखापरिक्षणाची पध्दत व आखणी केली असून जेणे करुन त्या परिस्थितीत ती योग्यच आहे. कंपनीच्या संचालकांनी वापरलेली लेख्यांची धोरणे ही उचित असलेबाबतचे मुल्यमापन आणि तयार केलेले लेखेबाबतची योग्यता तसेच एकंदरीत वित्तीय तक्त्यांचे सादरीकरण बाबतचे मुल्यमापण याचा लेखापरिक्षणात समावेश केलेला आहे.

लेखापरिक्षणात आम्हास मिळालेले वित्तीय तक्त्यांवर आमचे मत दर्शविणेस पुरेसे आणि उचित आहेत यावर आमचा विश्वास आहे.

**उचित मत बाबतचे आधार :**

१. रोखीचा प्रवाह तक्ता कंपनीने तयार केला आहे. तथापि लेख्यांचे प्रमाणीकरण ३ मधील आवश्यकतेनूसार काही बाबींची कमतरता आहे.

२. महामंडळाने लेख्यांची नोदबुक हस्तलिखीत ठेवलेली आहेत. त्यामुळे संगणकीय लेखे उपलब्ध झाली नाहीत म्हणून कांही प्रमाणात कपात पध्दत, आवश्यक लेख्यांची समायोजने निश्चिती, विशीष्ट मुलभूत बाबींचे ताळमेळाचे संकलन या बाबींवर अंतर्गत नियंत्रणाचा प्रभाव निश्चित सांगता येत नाही.

३. अनुसूची क्र. ३ मध्ये दर्शविलेली माल खरेदी करीता किरकोळ धनको, मत्ता खरेदी करीता किरकोळ धनको आणि इतर अनामत अनुक्रमे रु. ४५,३०,९४५ रु. १०,२३,३१० आणि रू. ८,२५,२२,४५१ याबाबत रुजूवात केलेली नाही. तरीही कंपनीने दिर्घ मुदतीचे दायित्व मध्ये दाखविलेली आहेत. त्यामुळे या बाबींचा वित्तीय तक्त्यांवरील परिणाम निश्चित करता येंवू शकत नाही.

४. **निर्लेखित खर्च**

अ) ताळेबंद मधील अनूसुची ३ मुद्दा क्र. "ड " याकडे आम्ही लक्ष वेधू इच्छितो, कि महामंडळाचे व्यवस्थापनाने व्यवस्थापकीय संचालकांचे मान्यतेने रू. २५,९१,२४४/- निर्लेखित केले आहेत. म्हणजेच दायित्व काढून टाकले आहे. सदर रक्कम हि इतर किरकोळ दायित्व मधील असून ती ३ वर्षे पेक्षा जास्त अदत्त बाकी होते. यामध्ये किरकोळ खरेदी आणि कंपनीने केलेले खर्चाचा समावेश आहे. संबंधित धनको कडून रुजूवात केलेली नाही.

५. अनूसुची क्र. ४ ड मध्ये कृषी आयकर रक्कम रु. ३,२८,१६,४९८/- ची तरतूद दिसत असून ती सन १९८३-१९८४ पेक्षाही जास्त वर्षापासून पुस्तकात दिसत आहे. परंतू सदर रक्कम ही शासनास दिली नाही आणि त्याबाबत रुजूवात करून दायित्वाची खात्रीपण केली नाही. जर त्यावर काही व्याज किंवा दंड असल्यास त्या विचारात न घेता सदर दायित्व पूर्वीप्रमाणेच पुढे चालू ठेवली आहे.

६. अनूसुची क्र. ४ ड मधील सेवाउपदानाची तरतूद ही व्यवस्थापनाने योग्य आधारावर अंदाजित केलेली आहे. तथापि सदर तरतूद ही विमागणक शास्त्रावर आधारित नाही म्हणून लेख्यांचे प्रमाणीकरण १५- कर्मचारी कल्याण नूसार केलेली नाही. सदर रक्कम ही अहवाल दिनांकापासून १२ महिन्यात अदा होईल असे अपेक्षित नाही तरीसुद्धा त्याचे चालू दायित्व मध्ये वर्गीकरण केले आहे.

७. खालील मुद्दे पाहता लेख्यामधील स्थिर मत्तांचे मुल्यांकन हे लेख्यांचे प्रमाणीकरण १० नूसार केलेले नाही.

**अ) वादग्रस्त मुल्यांकन**

१. व्यवस्थापनाने स्पष्टीकरण केले प्रमाणे सन १९६३-१९६५ मध्ये महाराष्ट्र शासनाने या मत्तांचे मुल्यांकन केले होते, परंतू तेव्हापासून ते वादग्रस्त आहे. ज्या साखर कारखान्यांकडून मत्ता संपादित केल्या त्याबाबतचे महाराष्ट्र शासनाने केलेल्या मत्तांचे मुल्यांकनास सहमत नसल्याने विक्री व्यवहार अंतिम झाले नाहीत. वेगवेगळया न्यायालयात या बाबतचे वाद प्रलंबित आहेत.

**ब) अपूरे ठेवलेल्या नोंदी आणि प्रत्यक्ष तपासणी**

१. कंपनीने जमीनीसह स्थिर मत्ता बाबतच्या नोंदी हया त्याबाबतची संख्यात्मक तपशिलासह सविस्तर तपशील आणि सध्याची जागा तसेच चालू स्थिती बाबतचा तपशिल पुरेसा ठेवलेला नसून, पुर्ण तपशिल दर्शवित नाहीत. याबाबत व्यवस्थापनाने आम्हास सांगितले की, स्थिर मत्ता रजिस्टर तयार केलेले आहे. परंतू ते बरेच कालावधी पासून आद्ययावत केलेले नाही.

२. मागील सहा वर्षांपेक्षा जास्त कालावधीत स्थिर मत्तांची प्रत्यक्ष तपासणी केलेली नाही. म्हणून स्थिर मत्तांची प्रत्यक्ष तपासणीचा कालांतर बाबतची योग्यता ही अपूरी आहे.

**क) वादग्रस्त मत्ता**

१. कंपनीने अनूसुची क्र. ५ टिप ब मध्ये नमुद केलेप्रमाणे विशिष्ट मत्तांचा भांडवलात समाविष्ट न करता त्यावर घसारा रू. ५४,९०६/- ची तरतुद केली आहे. व्यवस्थापन यांचे खुलाशानुसार महाराष्ट्र शासनाने सन १९६३-१९६५ मध्ये सदर मत्तांचे मुल्यांकन रक्कम रु. ३५,२६,२१७/- केले होते आणि ज्या साखर कारखाण्यांकडून संपादित केल्या होत्या ते महाराष्ट्र शासनाने केलेले मत्तांचे मुल्यांकन यास सहमत झाले नाहीत. त्यामुळे त्यांनी विक्रीचा अंतिम व्यवहार पूर्ण केला नाही.

२. कंपनीने रक्कम रु. ३५,२६,२१७/- कोटी पैकी रु. ३१,९९,५३७/- अग्रिम दिला आहे. शिल्लक रक्कम ही कंपनीकडून दिलेली नाही आणि कंपनी देणे किंवा दायित्व म्हणून अभिस्विकृत करीत नाही.

**ड) शासनाने संपादित केलेली जमीन**

१. शासनाने सुमारे १४८० एकर जमीन शासनाच्या प्राधिकारांत संपादित केल्या आहेत असे अनुसूची क्र. ३ टिप (क) आणि अनुसूची क्र. ५ टिप (इ) मध्ये नमूद केले आहे. दि. ३१.०३.२०१६ अखेर एकूण नुकसान भरपाई रक्कम रु. ४६५.४१ लाख मिळाली आहे. सदर जमीनीचा कायदेशीर हक्क महामंडळाकडे असून त्यांचे अंतिम निवाडा (ॲवॉर्ड) अद्यापही झालेला नाही म्हणून सदर रक्कम

ही चालू नसलेली दायित्व मध्ये " इतर किरकोळ धनको " या लेखाशिर्षकाखाली दर्शविली आहेत. कंपनीने त्याच बरोबर संबंधित मत्ता एकूण मत्तांमधून काढून टाकल्या नाहीत. जरी कंपनीचे या जमीनीवर नियंत्रण राहिलेले नाही आणि प्रत्यक्ष शासनाने संपादित केलल्या आहेत तरी कंपनी सदर जमीन स्थिर मत्तांमध्ये अव्यहातपणे दर्शवित आहे हे आमचे मते चूकीचे आहे.

**२.** त्यामुळे शासनाने सक्तीने संपादित केलेल्या वरील जमीन बाबतचे लेखांकन करताना नफा/तोटा काढला नाही आणि त्यांचे लेखांकन पण केले नाही**.**

**इ) खंडक-यांना जमीन वाटप**

१. सन १९७० मध्ये सुमारे १३५८० एकर जमीन खंडक-यांना वाटप केले आहे. सध्या आणखी लॉट मध्ये २२५६३ एकर जमीन वाटप केली आहे.तथापि अनुसूची क्र. ४ टिप (य) नुसार वाटप प्रक्रियेत किती जमीन वाटप होईल हे वाटप प्रक्रिया संपूर्ण झ ाालेनंतरच उपलब्ध होईल. म्हणजेच या वाटप पद्धतीने पुढील वाटपाकरिता आणखीन अजून किती जमीन लागणार आहे हे निश्चित करता येत नाही.

**फ**) खंडक-यांना जमीनी परत केले बाबतचे सविस्तर आणि योग्य कागदोपत्री पुरावा आमचे पडताळणी करीत उपलब्ध करुन दिले नाहीत. तथापि जमीन वाटप पद्धतीत अनियमितता झाली नसलेबाबत व्यवस्थापनाने दर्शीत केले आहे.

ग) तसेच कंपनीच्या १२१५ एकर क्षेत्रावर अतिक्रमण झाले आहे. अतिक्रमण संबंधीतच्या बाबी अनेक न्यायालयात प्रलंबित आहेत असे आम्हाला स्पष्ट करण्यात आले आहे.आम्ही सुद्धा यामध्ये आकस्मिक खर्च किती मर्यादेपर्यंत अंतर्भुत होवू शकेल हे निश्चित करण्यास आम्ही पण असमर्थ आहोत. लेंख्यांचे प्रमाणीकरण २८ प्रमाणे याबाबतीत किती वापरण्याजोगी नसलेली बाबत आवश्यक यथायोग्य तरतुद ही कंपनीने निर्धारित केली नाही.

(८) जमीन वाटपाबाबतची संपूर्ण पद्धत आम्ही तपासलेली नाही.

(९) अनुसूची क्र. ५ मध्ये दिलेल्या तपशिलानूसार रक्कम र. ५३,४०,८५४/- चालू भांडवली कामे दर्शविलेली आहे.परंतू प्रत्यक्ष कंपनीने शासनास संपादित मत्ताबाबत अग्रिम दिलेला आहे. म्हणून चालू कामे म्हणून चूकीचे वग्रीकरण केले आहे. तसेच त्याबाबत मत्तांचे स्वरूप आणि त्याचे स्थान व स्थिती बाबत स्पष्टीकरण केलेले नाही.

(१०) अनुसूची क्र. ७ मध्ये चालू नसलेली गुंतवणूक यामध्ये बहुतांक्ष यादीत नसलेले इक्विटी भाग आहेत की ज्यांचे बाजारात सक्रिय असलेले अस्तित्व नाही. म्हणून त्यांचे योग्य मुल्य लगेच उपलब्ध होवू शकत नाही. गुंतवणूकीच्या मुल्यात घट होते यास व्यवस्थापन सहमत आहे. तथापि मुल्यामधील घट ही तात्पुरती स्वरूपाची असते म्हणून या गुंतवणूकी मधील घट बाबत तरतूद केली नाही असे मत आहे.

(११) कंपनीने अनुसूची ९ आणि अनूसूची १० वस्तूसुची मध्ये वृक्ष शेती आणि फलोद्यान म्हणून दर्शविली असून अनेक ठिकाणी आहे. त्यामध्ये रु. ३,९६,९५,३७१ रकमेचा उभे पिक म्हणून समाविष्ट आहे. तथापि आमचे मते त्याचे मुल्यांकन करणेकरिता कंपनीने स्विकारलेले लेख्यांचे धोरण आणि पद्धत ही लेख्यांचे प्रमाणीकरण -२ बरोबर जूळत नाही कारण झ

अ) व्यवस्थापनाने वस्तुसूची ची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही. तसेच संख्यात्मक रेकॉर्ड आणि त्याचे मुल्यांकन आम्हाला उपलब्ध करून दिले नाही. व्यवस्थापनाने कंपनीचे आकारमान आणि व्यवसायाचे स्वरूपास अनुसरून वस्तूसुची ची प्रत्यक्ष पडताळणीकरीता अनुसरून केलेली पद्धत अपूरी असलेबाबत आमचे मत आहे.

ब) वृक्षशेती आणि फलोद्यान यांचे सुरवातीचे शिलकीचे मुल्यांकन हे सुरवातीपासून झालेला एकूण खर्च असून अखेरील शिलकीचे मुल्यांकन काढतांना सुरवातीचे शिलकीमधून चालू वर्षातील वृक्षशेती विक्री किंमत कमी करुन काढलेली आहे. आमचे मते कंपनीने वापरलेले सदर लेख्यांचे धोरण योग्य नाही.

क) वस्तूसुची मधून वापरात नसणारी, वापरण्यास योग्य नसणारी, खराब झालेल्या व नुकसान झालेल्या वस्तूसुची जर काही असतील तर विशेषतः वृक्ष शेती आणि फलोद्यान बाबत तरतूद केलेली नाही.

ड) वरील प्रमाणे वित्तीय तक्त्यांवर जर काही परिणाम होत असेल तर तो निश्चित करता येणे शक्य नाही.

(१२) ताळेबंदात (अनूसुची १० नूसार) दर्शविलेली व्यापारी येणी/इतर येणी यामध्ये येण्याचा मोठा भाग हा तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीचा असून न्याय प्रविष्ट आहेत. त्याबाबत कंपनीने रुजूवात केलेली नाही. या शिल्लकी येणे रक्कमाची ताळमेळ केलेला नाही. त्याचा ताळमेळ केलेला नसल्याने तसेच विशेषतः त्या येणे रक्कमा दिर्घ कालावधीच्या असल्याने त्याचा परिणाम निश्चित करता येणे शक्य नाही.

(१३) अल्प मुदतीची कर्जे आणि अग्रिम (अनूसुची १२) मध्ये कंत्राटदार विरुद्ध दावा करणे करीता कंपनीने रु. ८०,३०,०००/- न्यायालयात जमा केली आहे. आमचे मते जर कंपनीने दावा जिंकला तर सदर रक्कम वसूल होवू शकणारी असल्याने त्याचे वर्गीकरण हे प्रतिभूत अग्रिम म्हणून करायला पाहिजे. तसेच आमचे मते सदर बाब अनूसुची १८ मध्ये आकस्मिक मत्ता किंवा भविष्यात होवू शकणारा लाभ म्हणून

दाखवावयास पाहिजे होती. सुकृत दर्शनी सदर रक्कम जमा होत नसली तरी वित्तीय तक्त्यात दाखविणे लेख्याचे प्रमाणीकरण २९ यास अनूसरून नाही.

(१४) अनूसुची १२ मध्ये दर्शविलेले अल्प मुदतीचे कर्जे व अग्रिम बाबत सुद्धा पार्टी ऋणको यांचे कडून रुजूवात केलेली नाही.

(१५) अनूसुची १२ मध्ये रक्कम रू. २,०१,२३,३१९/- ही तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीची आहे. तथापि व्यवस्थापनाचे मते अल्प मुदतीचे असून त्या, आर्थिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये वसूल होतील.

(१६) उसांची येणे रक्कमेवरील व्याजाची येणे रक्कम रु. ३,४९,७८,७९९/- ही अनूसुची क्र. १४ अप्रत्यक्ष उत्पन्न - इतर उत्पन्न मध्ये दर्शविली असून समाविष्ट आहे.सदर बाब ही न्यायालयाचे अधीन राहून आहे. तथापि व्यवस्थापनाचे मते हे उत्पन्न सन्माननीय न्यायालयाचे आदेशानूसार उपर्जित तत्वावर निश्चित केलेले आहे.

(१७) अनूसुची ५ मध्ये दर्शविलेली दृश्य मत्तावरील घसारा रक्कम ही एस एल एम (सरळ) पद्धतीने काढलेली आहे. तथापि सदर घसारा रक्कम ही कंपनी कायदा २०१३ अनूसुची २ मधील भाग क (सी) मधील घसाराचे दरा नूसार नाही. यामधील अनेक मत्तांचे वापरण्याजोगे आयुष्य हे आयुष्यमाना पेक्षाही जास्तीचे आहेत. आमचे मते जर कंपनीला जे विशिष्ट नमुद केलेल्या वापरण्याजोगे आयुष्यमान बाबतची वेगळी पद्धत वापरावी असे वाटत असेल तर तज्ञ सल्लागार यांचे आधारावर याबाबत समर्थन देणेची आवश्यकता आहे.

(१८) आयकर कायदा १९६१ आणि कंपनी कायदा २०१३ या मध्ये घसारा बाबत टायमिंग फरक असल्याने लेख्यांचे प्रमाणिकरण - २२ नूसार उप्पन्ना वरील करांचे लंखांकन करताना मत्ता किंवा दायित्व म्हणून स्थगित कर असायला पाहिजे. तथापि कंपनीने स्थगित कराची कोणतीही तरतूद केलेली नाही हे लेख्यांचे धोरण उचित नाही.

### (१९) मान्य सांविधिक देणी लेख्यात घेतली नाहीत.

अ) वापरमुल्याने दिलेल्या प्रॉपटी पासून मिळालेल्या भाडयावरील देय सर्व्हिस कराची प्रारंभिक गणना पण केली नाही. आणि त्याची लेख्यात तरतूद पण केली नाही. वास्तविक सर्व्हिस कर ही सांविधिक देणीचा स्विकृत केलेला भाग असून त्याचे मूल्य निश्चित केले नाही.

### (२०) लेख्याचे प्रमाणीकरण २९ नूसार आकस्मिक दायित्व

अ) सेल्स टॅक्स/व्हॅट बाबत देणे रक्कम रु. ३,२०,६८०/- ची तरतूद अनूसुची ४ क - इतर चालू दायित्वे मध्ये केली आहे. तथापि व्हॅट बाबत पडताळणी आदेश आणि इतर कागदपत्रे उपलब्ध नसल्याने त्याबाबतची पुरेशी तरतूदी संबंधी आमचे अभिप्राय देवू शकत नाही.

ब) कंपनी विरूद्ध प्रलंबित अनेक न्यायालयीन दावेबाबत आणि कंपनीने सुध्दा इतर पार्टी विरुध्द दाखल केलेले न्यायालयीन दावे बाबत योग्य कायदेशीर मत मिळाले नसल्यामुळे आम्ही त्याचा परिणाम समाधानपूर्वक निश्चित करु शकलो नाही.

कलम १८९ नूसार आवश्यक असलेले संचालकांचे हित संबंधी असलेले कंत्राट किंवा करार बाबतचे रजिस्टर कंपनीने ठेवलेले नाही. तथापि याबाबतीत कंपनीच्या कोणत्याही करार आणि कंत्राट यामध्ये कंपनीच्या संचालकांचे हित संबंध नाहीत असे स्पष्टीकरण व्यवस्थापनाकडून आम्हास मिळाले आहे.

(२१) लेख्यांचे प्रमाणीकरण १८ आणि लेख्यांचे प्रमाणीकरण २४- नूसार मुख्य व्यवस्थापन व्यक्तीचे मिळकतीबाबत आणि संबंधित असलेले पार्टी व्यवहाराबाबत तपशील दर्शविणे कायद्याने आवश्यक असून कंपनीने त्याची पुरेशी पूर्तता केलेली नाही.

### उचित मत :

वर उल्लेख केलेल्या उचित मत बाबतचे आधार व्यतिरीक्त आमचे मते आणि आमचे माहीतीनूसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणास अनुसरून दि.३१ मार्च २०१६ रोजीची दर्शविलेली वित्तीय तक्ते हे कायद्यानूसार आवश्यक असलेल्या पध्दतीने माहिती दर्शवितात आणि सर्व साधारणपणे भारतातील कंपनी राज्य कारभाराची स्विकृत असलेल्या लेख्यांचे तत्वे विचारात घेता आवश्यक असलेली सत्यता आणि योग्यता दर्शवितात.

### महत्वाच्या बाबी बाबत :

**१. खंडक-यांना अदा करावयाचे भाडे पट्टा बाबत लेखांकन केले नसले बाबत-**

आम्हाला असे सांगण्यात आले की १९८२ पर्यंत खंडक-यांना भाडे पट्टा देण्यात आला होता. त्यानंतरही जमीनी महामंडळाच्या ताब्यात आणि वापरात असूनही त्यांचे भाडे पट्टा रक्कम अदा केली नाही. तसेच त्याची तरतूद ही केलेली नाही. तथापि आम्हाला असे सांगण्यात आले की १९८२ पर्यंत आणि त्यापूर्वी या जमीनीची महामंडळाच्या मालकीच्या नव्हत्या, म्हणून भाडे देत होतो. त्यानंतर जमीनी महामंडळाच्या मालकीच्या झाल्या तेव्हापासून भाडे अदा करणे बंद केले आहे.

## २. आकस्मिक दायित्वे-

अनुसूची १९ वित्तीय टिपा मध्ये दर्शविलेल्या आकस्मिक दायित्वामधील काही विशिष्ट प्रकरणी त्याचे (वेडी बाभूळ झाडे काढणे बाबत सह) स्वरुप व रक्कम बाबतची विशद करणारी सविस्तर आणि त्यास अनुशांगिक कागदपत्रे आमचे पडताळणी करीता उपलब्ध केले नाहीत. तथापि त्याबाबत व्यवस्थापनाने प्रकटीकरण बरोबर आणि पुरेसे आहे यावर आमचा भरवसा आहे.

## ३. प्रलंबित दाव्याचा परिणाम

कंपनीने प्रलंबित असलेल्या दाव्याचा वित्तीय तक्त्यामधील आर्थिक स्थिती वर होणा-या परिणामाचे प्रकटीकरण समर्पक केलेले नाही. आमचे मते कंपनी विरूध्द प्रलंबित असलेल्या अनेक दाव्याची यादी असून त्याबाबतचे कायदेशीर मत द्यावयास पाहिजे होते.

## ४. संचित तोटा

कंपनीचा संचित तोटा दि. ३१ मार्च २०१६ च्या वर्ष अखेरीस रक्कम रु. २,३४,८८,१२,२९७/- असून ती निव्वळ मुल्यापेक्षा जास्तीची आहे. तथापि शासकीय कंपनी असल्याने तोटा हा शासनाच्या निधी आणि कर्जात समायोजित होणारा आहे. त्यामुळे संस्था चालू राहील हया समज बाबत शंका नाही. या बाबीचा वित्तीय तक्त्यावर होणारा परिणाम निश्चित करता येत नाही.

५. **महामंडळ नियमनः-** चांगले नियमन नसलेबाबतचे खालील उदाहरणार्थ

अ) शुल्लक देय रक्कमांचे समायोजन आणि दुरूस्ती न करता पुढे चालू ठेवणे

ब) लेख्यांचे धोरण प्रभावी नसणे, विशेषतः जमीन संबंधी,

## ६. शासकीय देणी

अ) सन १९७२-१९७३ ते १९८३-१९८४ शी संबंधित असलेला वादग्रस्त कृषी आयकर रु. ३,२८,१६,४९८/- जो या तारखे पर्यंत अदा केला नाही किंवा समझोता केला नाही.

ब) अनुसूची ४ अ मध्ये दर्शविलेली अल्प मुदतीची उसनवार दायित्व रु. २,२७,६४,०३,३७४/- ही कंपनीने महाराष्ट्र शासनास द्यावयाची आहे आणि ती रुजूवात शिवाय आहे. मागील वर्षाची दिसत असलेली शिल्लक ही २०.९५ कोटीने कमी झाली असून त्यापैकी रू. १७.२० कोटी हे परत केले असून तसेच रू. ३.७५ कोटी अनूसुची क्र. ३ क मुद्दा नं. ५ चालू नसलेली दायित्वे मध्ये शासकीय देणी खाली वर्ग केली आहेत.

## ७. हस्तलिखित लेखांकन-

कंपनीने लेख्यांची पुस्तके ही हस्तलिखित नमुन्यात ठेवलेली असून त्यात कारकुनी चूक होवू शकते संगणकीय लेखे उपलब्ध नाहीत.

**एन पी एस आर आणि असोसिएटस**
**सनदी लेखापाल करीता**
**फर्म नोंदणी नं. : १०५५११ डब्ल्यु**
**सील सही**
**व्ही. एन. लाहोटी**
**भागीदार**
**सभासद नोंदणी नं. (१७०९५१)**

**ठिकाण : पुणे**
**दिनांक : २१-०३-२०१७**

**एन.पी.एस.आर. आणि असोसिएटस्**
**सनदी लेखापाल,**
**कार्यालय नं.१३ ते एम एस आर स्केअर,**
**चिंचवड रेल्वे स्टेशन मागे,**
**चिंचवड, पुणे - ४११ ०३३.**
**दूरध्वनी नं. ०२०-२७५१५५७५/२७५१५५८५**
**ई-मेल - nclahoti@yahoo.co.in**

## इतर कायदेशीर बाबी आणि नियमानुसार आवश्यकतेवरील अहवाल-

**१.** कंपनीचा (लेखापरिक्षकांचा अहवाल) आदेश २०१६ आदेशानुसार तसेच भारताचे केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या या कायद्याची कलम १४३ चे उपकलम (११) यास अनुसरुन आम्ही आमची अनुसूची अ दिलेली आहे आणि या कायद्याच्या मुद्दा क्र. ३ व ४ मध्ये नमुद केलेल्या बाबींवर मत दिले आहे.

**२. कायद्याचे कलम १४३(३) प्रमाणे आवश्यक अहवाल आम्ही देत आहोत.**

अ) आमचे लेखापरिक्षणास आवश्यक असलेली आमचे माहितीप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्ही पाहिली आहेत. तथापि अपूरे रेकॉर्ड ठेवलेले असल्याने आवश्यक असलेली काही माहिती कंपनी उपलब्ध करु शकली नाही.

ब) आमचे मते कायद्यानुसार आवश्यक असलेली योग्य ती लेखा पुस्तके ठेवलेली आहेत. असे आम्हाला लेखा पुस्तकांची तपासणी करतांना दिसून आले आहे.

क) कंपनीचे व्यवहार अनेक ठिकाणी आहेत. तथापि शाखेकरीता स्वतंत्र लेखा परिक्षणाची नेमणूक केलेली नाही.

ड) कंपनीने कायद्यानुसार आवश्यक असणारी योग्य लेख्याची पुस्तके ठेवलेली आहेत. तथपि त्यामध्ये काही त्रुटी असून अनेक लेख्यांचे प्रमाणीकरण नियमांची पुर्तता त्यात होत नाही. तसेच काही धोरणे उदा. घसारा बाबतची परिगणना ही नवीन कंपनी कायद्यास अनुसरून न करता कंपनी जूने लेख्यांची धोरणे चालू ठेवत आहे.

ई) आमचे मते दर्शविलेली वित्तीय तक्ते हे कंपनीज (लेखा) नियम, २०१४ चे नियम ७ प्रमाणे या कायद्याचे कलम १३३ मधील लेख्यांचे प्रमाणीकरण मध्ये नमुद केले प्रमाणे पुर्तता करीत नाहीत.

फ) आमचे मते वरील मुद्यांमध्ये, उचित मतबाबतचा आधार आणि महत्वाचे बाबी बाबत मध्ये विशद केलेल्या बाबींचा कंपनीच्या कामकाजावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

ग) कंपनीचे संचालकांची नियुक्ती महाराष्ट्र शासनाकडून केली जाते. कलम १६४(१) आणि १६४(२) मधील अटीचा भंग नियुक्त केलेल्या व्यक्तिकडून होत नाही म्हणून नियुक्त केलेले संचालक हे अनर्हता होत नाहीत. या व्यवस्थापनाने दिलेल्या स्पष्टीकरणावर आम्ही विश्वास ठेवला आहे.

ह) लेखे ठेवणेबाबत आणि त्यासंबंधी असलेला बाबी बाबत सर्व अर्हता, मर्यादा आणि प्रतिकूल शेरा हा उचित आधार आणि महत्वाच्या बाबी मधील मुद्यांमधून समोर ठेवला आहे.

ज) योग्य नोंदी नसल्याने, कंपनीच्या अनेक मळयावरील नोंदलेल्या प्रत्येक व्यवहाराबाबतची पुरेशी खात्री करुन घेता येत नव्हती. व्यवस्थापनाचे मते वित्तीय व्यवहार एकाच मध्यवर्ती ठिकाणापासून नियंत्रित केले जात असून अंतर्गत वित्तीय नियंत्रण पुरेसे आहे. व्यवस्थापनाने दिलेल्या स्पष्टीकरणा नूसार कंपनीने पुरेसे अंतर्गत वित्तीय नियंत्रण ठेवले आहे यावर आम्ही विश्वास ठेवला आहे.

**एन पी एस आर आणि असोसिएटस**
**सनदी लेखापाल करीता**
**फर्म नोंदणी नं : १०५५११ डब्ल्यु**

**सील सही**
**(व्ही. एन. लाहोटी)**
**भागीदार**
**सभासद नोंदणी नं. (१७०९५१)**

**ठिकाण :पुणे**
**दिनांक : २१/०३/२०१७**

**एन.पी.एस.आर. आणि असोसिएटस्**
**सनदी लेखापाल,**
**कार्यालय नं.१३ ते एम एस आर स्केअर,**
**चिंचवड रेल्वे स्टेशन मागे,**
**चिंचवड, पुणे - ४११ ०३३.**
**दूरध्वनी नं. ०२०-२७५१५५७५/२७५१५५८५**
**ई-मेल - nclahoti@yahoo.co.in**

## लेखापरिक्षण अहवालास अनुसरून अनुसूची अ

**महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित यांचे सदर यास दि. ३१ मार्च २०१६ रोजी संपणा-या वर्षाचा लेखापरिक्षक यांचा स्वतंत्र अहवाल बाबत अनुसूची आणि त्याबाबत अहवाल सादर करीतो की,**

१. स्थिर मत्ता तसेच जमिनीची नोंद बाबत सध्याची स्थिती त्याची जागा निश्चिती आणि संख्यात्मक तपशिलासह संपूर्ण माहिती दाखविणारी पुरेशी नोंद कंपनीने ठेवलेली नाही. स्थिर मत्तांची नोंद नोंदवहीत ठेवली आहेत. परंतु फार पूर्वीपासून ती अद्ययावत केलेली नाहीत असे व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले आहे.

अ) व्यवस्थापनाने जवळपास मागील सहा वर्षापेक्षा जास्त वर्षा पासून स्थिर मत्तांची प्रत्यक्ष तपासणी केलेली नाही. त्यामुळे स्थिरमत्तांची प्रत्यक्ष तपासणी किती कालावधीनंतर करणे बाबतची योग्यता पुरेशी नाही. परिणामी जी काही खरीखुरी तफावत असेल त्याचा शोध व्यवस्थापनाने घेतलेला नाही.

ब) कंपनीने संस्था दिर्घकाल चालू राहील या दर्जास परिणाम होईल अशाप्रकारे स्थिर मत्तेतील मोठ्या प्रमाणात मत्तांची विल्हेवाट चालू वर्षात केलेली नाही.

२. अ) आम्हाला दिलेल्या माहितीनूसार आणि खुलाशानुसार व्यवस्थापनाने लेख्यांच्या वर्षअखेरीस वृक्षशेती, फलोद्यान आणि इतर लागवडी वगळून वस्तुसूचींची प्रत्यक्ष तपासणी केलेली आहे. आमच्या मते, वृक्षशेती, फलोद्यान आणि इतर लागवडी याची वस्तुसूची ही वस्तूसूचीमधील ठळक भाग असताना त्यांची तपासणी केलेली नाही. आणि प्रत्यक्ष तपासणीची संख्याही योग्य नाही.

ब) कंपनीने वस्तूसुची बाबतचे नोंदी योग्य पध्दतीने ठेवलेल्या नाहीत. अनेक रोपणी केलेल्या वृक्षशेती आणि फलोद्यान यांची प्रत्यक्ष तपासणी चालू ठेवली नाही म्हणून जर काही त्रुटी असतील तर त्या कंपनीने निश्चित केलेली नाही.

३. आम्हाला दिलेल्या माहितीस अनुसरून कंपनीने कलम १८९ मधील तरतुदीनूसार घेतलेली किंवा दिलेली कर्जे बाबत नोंदवही ठेवलेली नाही. कायद्याच्या कलम १८९ नूसार कंपनीस किंवा कंपनीकडून संस्था किंवा इतर पार्टी यांचेकडून घेतलेली किंवा दिलेली कर्जे ही प्रतिभूत किंवा अप्रतिभूत बाबत तपशील या नोंदवहीत ठेवला जात असतो. त्यामुळे जर काही असे घेतलेली किंवा दिलेली कर्जे असतील तर त्यावर आम्ही अभिप्राय देवू शकत नाही.

४. आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आणि खुलाशानुसार आमचे मते कंपनीचा आकार आणि वस्तुसूची व मालमत्ता यांची खरेदी तसेच मालाची विक्री इत्यादी व्यवसाय पहाता अंतर्गत नियंत्रण पध्दत आणखीन वाढविण्याची आवश्यकता आहे. नियंत्रण पध्दतीतील मोठया प्रमाणात कमकुवतपणा सुधारीत करणेत सातत्याने अपयशी आहेत असे आमचे निदर्शनास आले नाही.

५. कंपनी कायद्याच्या कलम ७३ ते ७६ नूसार कंपनीने बाहेरील लोकांकडून कोणत्याही प्रकारच्या ठेवी स्विकारलेल्या नाहीत.

६. कायद्याच्या कलम १४८ (१) नूसार कंप्नीने कोणतीही सर्व्हिस दिली असली तरी त्यास परिव्यय कागदपत्रे ठेवणेबाबत केंद्र शासनाने नमूद केलेले नाही.

७. **कायदेशीर देणी बाबत :-**

भविष्य निर्वाह निधी ,कर कपात, विक्रीकर /व्हॅट , जमीन महसूल/स्थानिक कर, व्यवसाय कर आणि कामगार कल्याण निधी या देय रकमेबाबत वर्षवार/माहेवार सुरवातीची शिल्लक , वर्षभरात अदा करावयाची देय रक्कम, वर्षभरात अदा केलेली रक्कम आणि वर्षवार/माहेवार अखेरील शिल्लक दर्शविणारे पडताळणीचे एकत्रिकरण या मध्ये कंपनीची अंतर्गत नियंत्रण पध्दत नाही. तसेच दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी वादग्रस्त नसलेली देय थकीत संविधानिक देणी बाबत देय झालेपासून ६ महिन्यापेक्षा जास्तीची देय असलेल्या माहितीचे एकत्रिकरण कंपनीने केले नाही. वरील प्रमाणे विचारात घेता दिनांक ३१ मार्च २०१६ रोजी ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीच्या देय संविधानिक देणी यावर आम्ही अभिप्राय देऊ शकत नाही. आमची ठळक निरिक्षणे पुढील प्रमाणे :

अ ) विक्रीकर/व्हॅट बाबतची अनुसूची आणि त्याबाबत इतर माहिती अभावी त्या बाबतचे वेळेवर रकमा अदा झाल्यात यावर आम्ही अभिप्राय देऊ शकत नाही.

ब ) सन १९७२-७३ ते १९८३-८४ या वर्षामधील वादग्रस्त नसलेली कृषि आयकराची देय रक्कम रु.३२८.१६ लाख इतकी आहे.

क) कंमनीने जून ३०, २००९ ते ३१ मार्च २०१६ रोजी संपलेल्या वर्षामध्ये भाडयाने दिलेल्या मालमत्तेपासून मिळालेल्या भाडे रकमेवरील देय सेवा कर काढलेला नाही.

ड) मालमत्ता कराबाबत काही संविधानिक देणी बाकी रक्कम देय असेल तर ती रेकॉर्ड नसल्याने निश्चित करु शकलो नाही.

८. कंपनीने वित्त संस्था, बँका किंवा कर्जरोखे वितरीत करून कोणत्याही प्रकारचा निधी उभारलेला नाही. तथापि सन १९६३ पासून पगार खर्च व्यवस्थापन व दैनंदिन खर्च भागविणेकरीता महाराष्ट्र शासनाकडून कर्जे घेतलेली आहेत. अनुसूची ३अ प्रमाणे दि.३१ मार्च २०१६ रोजी रक्कम रु. २,२७,६४,०३,३७४/- कर्ज देय आहे. तसेच अनुसूची ३ क इतर किरकोळ वित्तीय दायित्व मध्ये रु. ३,७५,००,०००/- शासन कर्ज आणि अग्रिम बाबत समावेश असून देय आहे. त्याशिवाय कॅनरा बँकेकडून मिळणा-या भाडे रक्कमे पैकी ५० टक्के राज्य शासनास द्यावयाची आहे. सदर रक्कम ही अनुसूची ३ क इतर किरकोळ वित्तीय दायित्व यामध्ये समाविष्ट आहे. तथापि त्याबाबत महाराष्ट्र शासनाकडून रुजूवात केलेली नाही आणि म्हणून त्याबाबत खात्री देवू शकत नाही.

९. आम्हाला दिलेल्या माहिती नूसार कंपनीने दि.३१ मार्च २०१६ रोजी संपणा-या वर्षात भांडवल किंवा कर्जे नव्याने घेतलेली नाहीत.

१० आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानूसार आमचे लेखापरिक्षण कालावधीत कंपनीने किंवा कंपनीमधील अधिकारी किंवा कर्मचारी यांचेकडून अफरातफरी केलेली अथवा नोंद झालेली नाही.

११. आम्हाला दिलेल्या माहितीनूसार आणि कंपनीचे नोंद पुस्तकावरील आमचे लेखापरिक्षणाच्या आधारे कायद्याचे अनुसूची ५ मध्ये नमूद केलेली १९७ नूसार कंपनीने दिलेले/तरतूद केलेले व्यवस्थापकीय मानधन यास आवश्यक मान्यता घेतलेली नाही. तथापि आम्हाला असे सांगण्यात आले की राज्य शासनाचे धोरणा नूसार व्यवस्थापकीय संचालक आणि इतर आधारस्तंभ अधिकारी यांना व्यवस्थापकीय मानधन अदा करण्यात येते.

१२. आमचे मते आणि आम्हाला दिलेल्या माहितीस अनुसरून कंपनी ही पत कंपनी नाही. त्यानुसार आदेशातील मुद्या क्र. ३ (१२) लागू होत नाही.

१३. कायद्याचे कलम १७० नूसार संचालक आणि आधारस्तंभ व्यवस्थापकीय व्यक्ती आणि त्यांचे भागधारण बाबतचे नांदवही कंपनीने ठेवलेली नाही. तथापि कलम १८९ नूसार आवश्यक असलेली संचालकांचे हित संबंध असलेले कंत्राट/न्यायप्रविष्ट बाबतची नोंदवही ठेवलेली नाही. म्हणजेच कायद्याने आणि लेख्यांचे प्रमाणिकरण एएस १८ आणि १ले एस २४प्रमाणे आवश्यक असलेले संबंधित पार्टी व्यवहार बाबतचा तपशिलाची व्यवस्थापन सादरीकरण बाबतची पूर्तता कंपनीने केलेली नाही.

१४. आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरण यास अनुसरून आणि कंपनीच्या नोंदीचे आम्ही केलेल्या तपासणीचे आधारावर चालू वर्षात कंपनीने भागांची अधिमान्य वाटप किंवा खाजगी स्थान किंवा पुर्ण किंवा अंशत: डिबेंचर मध्ये रूपांतरीत केलेले नाही.

१५. आम्हाला दिलेल्या माहिती आणि स्पष्टीकरण यास अनुसरून आणि कंपनीच्या नोंदीचे आम्ही केलेल्या तपासणीचे आधारावर संचालक किंवा संबंधित व्यक्ती यांचेशी अरोखीय देणे/घेणे व्यवहार केलेले नाहीत. म्हणून आदेशाचे मुद्या क्र. ३ (१५) लागू होत नाही.

१६. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया १९३४ चे कायद्यान्वये ४५-आय खाली कंपनीची नोंदणी करणेची आवश्यकता नाही.

**एन पी एस आर आणि असोसिएटस**
**सनदी लेखापाल करीता**
**फर्म नोंदणी नं : १०५५११ डब्ल्यु**

**सील सही**
**(व्ही. एन. लाहोटी)**
**भागीदार**
**सभासद नोंदणी नं. (१७०९५१)**

**ठिकाण :पुणे**
**दिनांक : २१/०३/२०१७**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

## ३१ मार्च २०१६ रोजी सारांशरुपात ताळेबंद

**(रुपये लाखात )**

| | ३१ मार्च २०१६ अखेर | ३१ मार्च २०१५ अखेर |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| **कंपनीने काय मिळविले** | | |
| १. निव्वळ स्थिर मत्ता | ५८१.८२ | ६३३.२६ |
| २. गुंतवणूकी | १४८.९८ | १५०.६५ |
| ३ निव्वळ चालू मत्ता | (१,१७९.८९) | (२९३.०४) |
| ५. संचित तोटा | २३,४८८.१२ | २३,५३७.८४ |
| **एकूण मत्ता (निव्वळ)** | **२३,०३९.०३** | **२४,०२८.७१** |
| **कंपनीचे काय देणे.** | | |
| १. कर्जे | २२,७६४.०३ | २३,७५३.७१ |
| २. भरणा केलेले भाग भांडवल | २७५.०० | २७५.०० |
| **३. एकूण गुंतविलेला निधी** | **२३,०३९.०३** | **२४,०२८.७१** |

## ठळक बाबी एका दृष्टीक्षेपात

**(रुपये लाखात)**

| | अनुसूची | २०१५-२०१६ | २०१४-२०१५ |
|---|---|---|---|
| | | रुपये | रुपये |
| व्यवहारातून मिळाले उत्पन्न | १२ | १४१५.१९ | ६२३.०४ |
| इतर उत्पन्न | १३ | ८४३.९८ | ८४४.८७ |
| **एकूण..** | | **२,२५९.१७** | **१,४६७.९१** |
| **व्याज, घसारा, कर पूर्व नफा/(तोटा)** | | १,३८५.२५ | ५४६.११ |
| **व्याज** | | १,११४.२९ | १,१०७.७२ |
| घसारा | | १३.०४ | २०.६७ |
| मागील वर्षाचे संबंधित खर्च पूर्व नफा/(तोटा) | | २५७.९२ | (५८२.२८) |
| मागील वर्षाचे संबंधित खर्च | | (१६५.२२) | (२,१००.२८) |
| कर पूर्व नफा/(तोटा) | | ९२.७० | (२,६८२.५६) |
| कर | | ४२.९८ | ४०.५२ |
| करा नंतरचा नफा/(तोटा) | | ४९.७२ | (२,७२३.०८) |
| संचित नफा/(तोटा) | | (२३,४८८.१२) | (२३,५३७.८४) |
| भरणा केलेले भाग-भांडवल | | २७५.०० | २७५.०० |
| गुंतविलेले भांडवल | | (११,२३९.००) | (१२,३९४.००) |
| वस्तु सूचीची उलाढालीशी टक्केवारी | | ३५६.४४ | १४८.२३ |

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

## ३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे ताळेबंद

**(रूपये )**

| तपशिल | अनुसूची | ३१ मार्च २०१६ अखेर | ३१ मार्च २०१५ अखेर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| **१. सर्वसाधारण शेअर्स व दायित्वे** | | | |
| **(१) भागधारक निधी** | | | |
| अ) भाग भांडवल | १ | २७,५००,००० | २७,५००,००० |
| ब) राखीव व शिल्लक | २ | (२,३४८,८१२,२९७) | (२,३५३,७८४,०६१) |
| क) भाग अधिकार पत्रापोटी जमा रक्कम | | - | - |
| **(२) देय भागापोटी जमा भाग अर्ज रक्कम** | | **-** | **-** |
| **(३) चालू नसलेली दायित्वे** | **३** | | |
| अ) दिर्घ मुदतीची कर्जे | ३ अ | - | - |
| ब) विलंब कर दायित्वे(निव्ळ) | ३ ब | - | - |
| क) इतर दिर्घ मुदतीचे दायित्वे | ३ क | ४६६,५३७,७०२ | ३११,५१५,६३४ |
| ड) दिर्घ मुदतीची तरतूदी | ३ ड | - | - |
| **(४) चालू दायित्वे** | **४** | | |
| अ) अल्प मुदतीची कर्जे | ४ अ | २,२७६,४०३,३७४ | २,३७५,३७१,५४२ |
| ब) व्यापारी देणी | ४ ब | - | - |
| क) इतर चालू दायित्वे | ४ क | ३८,२५५,५५७ | ५७,७२३,६९३ |
| ड) अल्प मुदतीच्या तरतुदी | ४ ड | १०४,५२८,६१५ | ११२,५२२,१५९ |
| **एकूण** | | **५६४,४१२,९५१** | **५३०,८४८,९६८** |
| **२) स्थिरमत्ता** | | | |
| **चालू नसलेली मत्ता** | | | |
| **(१) (अ) स्थिरमत्ता** | | | |
| १) दृष्य मत्ता | ५ | ५२,८४१,०२१ | ५७,९८५,०५८ |
| २) अदृष्य मत्ता | | - | - |
| ३) चालू भ्ांडवली कामे | ६ | ५,३४०,८५४ | ५,३४०,८५४ |
| ४) विकसीत अदृष्य मत्ता | | - | - |
| (ब) चालू नसलेल्या गुंतवणूकी | ७ | १४,८९८,४३७ | १५,०६५,२५७ |
| (क) विलंब कर मत्ता (निव्वळ) | | - | - |
| (ड) दिर्घ मुदतीची कर्जे व अग्रिम | | - | - |
| (इ) इतर चालू नसलेली मत्ता | ८ | - | - |
| **(२) चालू मत्ता** | | | |
| (अ) चालू गुंतवणूक | | | |
| (ब ) वस्तू सूची | ९ | ३९,७०३,६९३ | ४२,०३३,०४७ |
| (क ) व्यापारी येणी | १० | ४०१,८८२,२९६ | २७८,१०१,०६६ |
| (ड ) राखै आणि रोखी समान | ११ | १५,८७२,५२० | ७५,६१२,९४८ |
| (इ ) अल्प मदतीची कर्ज व अग्रिम | १२ | ३३,८७४,१३० | ५६,७१०,७३८ |
| (फ) इतर चालू मत्ता | | - | - |
| **एकूण..** | | **५६४,४१२,९५१** | **५३०,८४८,९६८** |

**सोबत जोडलेल्या आमच्या अहवालाप्रमाणे** **कृपया वित्तीय टीपा अनुसूची क्रमांक १८ पाहाव्यात.**

**मे. एन.पी.एस.आर.आणि असोसिएटस, सनदी लेखापाल यांचेकरिता.**

| सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|
| **(सीए विवेक एन. लाहोटी)** | **( जी. आर. खरात )** | **(आर.बी.भागडे, भा.प्र.से.)** | **(विपिन शर्मा, भा.प्र.से.)** |
| **भागीदार सभासद क्र. १७०९५१** | **मुख्य कार्यकारी ( प्रशासन) /सचिव** | **व्यवस्थापकीय संचालक** | **संचालक.** |

नफा-तोटा पत्रक

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

## ३१ मार्च २०१६ रोजी संपणाऱ्या वर्षाचा नफा-तोटा लेखा.

*(रूपये)*

| तपशिल | अनुसूची | २०१५-२०१६ | २०१४-२०१५ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. व्यवहारातून मिळालेले उत्पन्न | १३ | १४१,५१९,७८६ | ६२,३०३,९०१ |
| २. इतर उत्पन्न | १४ | ८४,३९७,७५२ | ८४,४८७,४६५ |
| **३. एकूण उत्पन्न (१+२)** | | **२२५,९१७,५३८** | **१४६,७९१,३६६** |
| **४. खर्च** | | | |
| वापरलेल्या सामानाची किंमत | | - | - |
| व्यवहारातील खरेदीसाठा | | - | - |
| विक्रीयोग्य मालाचे साठयातील बदल | | - | - |
| चालू कामे आणि व्यपारी साठा | १५ | २,१२१,५८३ | ३,९२२,२३३ |
| कर्मचारी कल्याण खर्च | १६ | ७५,३०९,८५० | ७७,६२०,७९० |
| वित्त किंमत | | . | . |
| घसारा आणि विभांगणी खर्च | ५A | १,३०४,४८८ | २,०६६,६३९ |
| इतर खर्च | १७ | १२१,३८९,२८३ | १२१,४०९,८१० |
| **एकूण खर्च** | | **२००,१२५,२०४** | **२०५,०१९,४७२** |
| **५. अपवादात्मक आणि उल्लेखनिय बाबी आणि करा पुर्वीची नफा /(तोटा) (४ -३ )** | | **२५,७९२,३३४** | **(५८,२२८,१०६)** |
| ६. अपवादात्मक बाबी | | - | - |
| १. मागील वर्षाचे संबंधित खर्च | १८ | १६,५२२,५७० | २१०,०२८,४६० |
| **७. उल्लेखनीय बाबी आणि करा पुर्वीचा नफा / (तोटा) (५-६)** | | **९,२६९,७६४** | **(२६८,२५६,५६६)** |
| ८. उल्लेखनीय बाबी | | - | - |
| **९. कर पुर्व नफा / (तोटा) (७-८)** | | **९,२६९,७६४** | **(२६८,२५६,५६६)** |
| १०. कर खर्च | | | |
| (१) चालू कर | | ४,२९८,००० | ४,०५२,००० |
| (२) विलंब कर | | - | - |
| **११. चालू कालावधीतील व्यवहारापासून नफा / (तोटा ) (९-१०)** | | **४,९७१,७६४** | **(२७२,३०८,५६६)** |
| १२. व्यवहारात खंड पडल्याने झालेला नफा / (तोटा) | | - | - |
| १३. व्यवहारात खंड पडल्याने कर खर्च | | - | - |
| १४.व्यवहारात खंड पडल्याने नफा (तोटा) (करा नंतर) (१२-१३) | | - | - |
| १५.कालावधीतल नफा / (तोटा) (११-१४) | | ४,९७१,७६४ | (२७२,३०८,५६६) |
| १६. सर्वसाधारण भांगाची प्रत्येकी मिळकत | | १८० | (९,९०२) |
| मूळ | | १८० | (९,९०२) |
| जिरवलेले | | - | - |

**सोबत जोडलेल्या आमच्या अहवालाप्रमाणे** **कृपया वित्तीय टीपा अनुसूची क्रमांक १८ पाहाव्यात.**

**मे. एन.पी.एस.आर.आणि असोसिएटस, सनदी लेखापाल यांचेकरिता.**

| सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|
| **(सीए विवेक एन. लाहोटी)** | **( जी. आर. खरात )** | **(आर.बी.भागडे, भा.प्र.से.)** | **(विपिन शर्मा, भा.प्र.से.)** |
| **भागीदार सभासद क्र. १७०९५१** | **मुख्य कार्यकारी ( प्रशासन) /सचिव** | **व्यवस्थापकीय संचालक** | **संचालक.** |

**अनुसूची क्रमांक १**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

## ३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे ताळेबंदाचा भाग असलेली अनुसूची
## अनुसूची क्रमांक १, बाब क्रमांक १ (अ)
## भाग भांडवल

| तपशिल | ३१ मार्च २०१६ अखेर | ३१ मार्च २०१५ अखेर |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| **अधिकृत भाग भांडवल** | | |
| ३०००० सममूल्य भाग प्रत्येकी १००० रुपये शासनाने विक्रीस काढलेले व अभिदत्त केलेले | ३०,०००,००० | ३०,०००,००० |
| २७५०० सममूल्य भाग प्रत्येकी १००० रुपये महाराष्ट्र शासनाकडून विक्रीस काढलेले व अभिदत्त केलेले | २७,५००,००० | २७,५००,००० |
| **एकूण..** | **२७,५००,०००** | **२७,५००,०००** |

### अ) वर्षाच्या सुरूवातीची आणि अखेरील देय भाग भांडवलाचे ताळमेळ

| तपशिल | ३१ मार्च २०१६ अखेर | | ३१ मार्च २०१५ अखेर | |
|---|---|---|---|---|
| | भागांची संख्या | रुपये | भागांची संख्या | रुपये |
| वर्षाच्या सुरूवातीस | २७,५०० | २७,५००,००० | २७,५०० | २७,५००,००० |
| वर्षामध्ये वाटलेले | - | - | - | - |
| वर्षाच्या अखेरीस | २७,५०० | २७,५००,००० | २७,५०० | २७,५००,००० |

### ब) कंपनीच्या एकूण भागभांडवलापैकी ५ % पेक्षा जास्त भागभांडवल धारण करणारे भागधारकांचा तपशिल

| भागधारकाचे ााव | ३१ मार्च २०१६ अखेर | | ३१ मार्च २०१५ अखेर | |
|---|---|---|---|---|
| | भागांची संख्या | टक्केवारी | भागांची संख्या | टक्केवारी |
| राज्यपाल, महाराष्ट्र | २७,४९८ | ९९.९९% | २७,४९८ | ९९.९९% |
| **एकूण** | **२७,४९८** | | **२७,४९८** | |

**अनुसूची क्रमांक २**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

## ३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे ताळेबंदाचा भाग असलेली अनुसूची

## अनुसूची क्रमांक २, बाब क्रमांक १ (ब)

## राखीव व शिल्लक

| तपशिल | ३१ मार्च २०१६ अखेर | ३१ मार्च २०१५ अखेर |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| **अ) अग्रिम तारण खाते** | - | - |
| **ब) सर्वसाधारण राखीव** | - | - |
| **क) नफा-तोटा तक्त्यातील शिल्लक** | - | - |
| मागिल ताळेबंदाप्रमाणे | (२,३५३,७८४,०६१) | (२,०८१,४७५,४९५) |
| अधिक चालू वर्षातील/कालावधीतील नफा | ४,९७१,७६४ | (२७२,३०८,५६६) |
| **अखेरील शिल्लक** | **(२,३४८,८१२,२९७)** | **(२,३५३,७८४,०६१)** |
| **एकूण..** | **(२,३४८,८१२,२९७)** | **(२,३५३,७८४,०६१)** |

**अनुसूची क्रमांक ३ अ, ब, क, ड**

## ३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे ताळेबंदाचा भाग असलेली अनुसूची

## अनुसूची क्रमांक ३ अ, ब, क, ड

## चालू नसलेली दायित्वे व तरतूदी

| | ३१ मार्च २०१६ अखेर | ३१ मार्च २०१५अखेर |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| **३अ) दिर्घ मुदतीची कर्जे** | - | - |
| **३ब) कर दायित्व** | - | - |
| **३क) दिर्घ मुदतीची दायित्व** | | |
| १) माल खरेदीकरिता किरकोळ धनको | ४,५३०,९४५ | ४,७७०,५४१ |
| २) मत्ता खरेदीकरिता किरकोळ धनको | १०,२०३,३१० | १०,२०३,३१० |
| ३) सुरक्षा ठेवी | १८८,९४०,७५९ | ९४,४०७,८४१ |
| ४) अनामत | ८२,५२२,४५१ | ४७,५७३,३४३ |
| ५) शासकीय देणी | १२०,६८३,२०७ | ९५,९४१,३५३ |
| ६) कर्मचारी कल्याण खर्च | | |
| ६.१) सेवा उपदान (पुर्व व्यवस्थापन अंशदान सह ) | १,५०१,७३० | १,३१७,०५५ |
| ७) इतर किरकोळ धनको | ५८,१५५,३०० | ५७,३०२,१९१ |
| **एकूण-** | **४६६,५३७,७०२** | **३११,५१५,६३४** |
| **३ड) ) दिर्घ मुदतीची** | – | – |

**टिपा:-**

अ) दि. ३१/०३/२०१६ रोजीचे ताळेबंदात दिसत असलेल्या धनको, ठेवीदार आणि इतर जमा शिलकी धनको कडून रुजवात पत्रके मिळविलेली नाहीत. सदरची शिल्लकी रक्कमांची पडताळणी झालेली नसून मुख्य कार्यालय, मळे व साखर कारखाने यांचेमधील शिलकी रकमांचे समायोजन होणे बाकी आहे. विशेष म्हणजे सदरची बाब ही फार वर्षांपासूनची असल्याने अशा प्रकारची पडताळणी न झाल्यामुळे त्याचा वित्तीय तक्त्यांवरील परिणाम काढता येऊ शकत नाही.

ब) अनुसूची क्र. ५ मधील टिपणी (ड ) मध्ये नमूद केलेनुसार सदाशिवनगर मळयावरील ३४०५ एकर क्षेत्रांबाबत निवाडा झालेला नसल्यामुळे या जमिनीचे मूल्य काढता येत नाही. त्यापैकी ११ एकर जमिन शासनाने संपादित केलेली असून त्यापोटी ३१/०३/२०१६ अखेर अंशत:

रक्कम रूपये १.८९ लाख (मागील वर्षी रुपये १.८९ लाख ) मिळालेली आहे. सदरील रक्कम निवाडया अभावी " चालू नसलेली दायित्वेमध्ये "इतर किरकोळ धनको " या शिर्षकाखाली दाखविलेली आहे.

क ) १४८० एकर जमिनीचे क्षेत्र शासनाने संपादन केलेले आहे. (कृपया अनुसूची क्र. ५ मधील टिपणी "इ" पहावी.) सदरच्या जमिनीच्या भरपाईच्या रकमेबाबत अद्याप निवाडा झालेला नसल्यामुळे त्याची तरतूद केलेली नाही. महामंडळास सदरील वर्षात सक्तीने संपादन केलेल्या जमिनीपोटी नुकसान भरपाईचा भाग म्हणून रक्कम रु. ९.०२ लाख प्राप्त झाली आहे. दिनांक ३१/०३/२०१६ अखेर पर्यंत भरपाईची एकूण मिळालेली रक्कम रू.४६५.४१ लाख (मागील वर्षी रू. ४५६.३९ लाख) एवढी आहे. सदरची रक्कम निवाडया अभावी चालू नसलेली दायित्वेमध्ये "इतर किरकोळ धनको " या शिर्षकाखाली दर्शविलेली आहे.

ड) सन १९६४-१९६५ ते २०११-२०१२ या वर्षामधील रक्कमा की ज्या तीन वर्षापेक्षा अधिक काळ देय आहेत त्या सन २०१५-२०१६ या वर्षात निर्लेखित केलेल्या आहेत. तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | रुपये |
|---|---|---|
| १ | इतर किरकोळ धनको | २५,९१,२४४.०० |

इ ) इतर किरकोळ ऋणको यामध्ये १४ मळयावरील सन १९६४-६५ ते १९७०-७१ या कालावधील शासनास अदा करावयाची जमिनीच्या भाडयाची रक्कम रु. २.२४ कोटी चा समावेश आहे.

फ.) **कर्मचा-यांना लाभ-**

* सेवा उपदानाच्या दायित्वाची लेखा पुस्तकात तरतूद करताना वर्षाच्या अखेरीस म्हणजेच दि. ३१-०३-२०१६ रोजी सर्व सेवानिवृत्त झ ाालेले आहेत असे गृहीत धरून प्रत्यक्ष येत असलेले दायित्व त्यामध्ये पूर्व व्यवस्थापनाकडून येणे असलेल्या त्यांच्या हिश्याची रक्कम विचारात घेऊन सेवाउपदान दायित्वाची तरतूद केलेली आहे.

* वर उल्लेख केलेली कर्मचारी लाभाची (सेवाउपदान दायित्व ) तरतूद ही विमागणक पध्दतीनुसार केलेली नाही.

ग ) स्थिर मत्तेच्या अनुसूचीत खालील मत्तांचा कि ज्यांच्या मालकी हक्काविषयी ज्यांचे व्यवहार अंतिम स्वरूपात पूर्ण करणे प्रलंबित आहेत अशा मत्तांचा समावेश होत नाही. सदरील मत्ता महामंडळाच्या ताब्यात असून ती वापरात आहे.

| तपशिल | रूपये |
|---|---|
| **जमिन व बिगर शेतकी जमिनीवरील इमारती** | **३४,१४,१४८-००** |
| **इतर मत्ता** | **१,१२,०६९-००** |
| **एकूण :-** | **३५,२६,२१७-००** |

तथापि वर नमूद केलेल्या मत्तांवरील घसार रू.५४,९०६/- हा नफा-तोटा पत्रकामध्ये खर्ची टाकलेला असून चालू दायित्व या शिर्षकाखाली दाखविलेला आहे. रक्कम रूपये ३५,२६,२१७/- बाबतचा हिशोब झालेला नसल्याने रक्कम रूपये ३१,९९,५३७/-समायोजित झालेली नाही. फरक रक्कम रुपये ३,२६,८८०/- अनुसूची क्रमांक १९ मध्ये आकस्मिक दायित्वेमध्ये दर्शविली आहे.

**ह ) शासकीय देय बाकी आणि देय यामध्ये खालील समावेश आहे.**

| तपशिल | २०१५-२०१६ | २०१४-२०१५ |
|---|---|---|
| बेलापूर कंपनीस वापरमूल्यावरील देय व्याज | १,२२,७०,०२९.०० | १,१७,८२,०६३.०० |
| भोगवटा मूल्यावरील व्याज | २,२९,०७,४१७.३७ | २,२५,११,८७१.३७ |
| शासनास देय कर्ज व अग्रिम | ३,७५,००,०००.०० | - |
| सी.एम.आर निधी/ध्वज निधी/विमा/संघटना वर्गणी | २,३९,६३४.०० | १५,७३९.६३ |
| ५० % कंनरा बँक वापरमूल्य शासनास देय | ९१,१३,४८६.३० | ८१,६१,११२.३० |
| पाणिपट्टी | १,७२,६७,३८१.६९ | ३,२०,८५,३१८.४९ |
| जमीन वापरमूल्य | २,१३,८५,२५८.२८ | २,१३,८५,२५८.२८ |
| **एकूण** | **१२,०६,८३,२०६.६४** | **९,५९,४१,३५३.०७** |

य )**इतर किरकोळ धनको यामध्ये खालील समावेश आहे.**

| तपशिल | २०१५-२०१६ | २०१४-२०१५ |
|---|---|---|
| कामगार कल्याण निधी | ४,३८,५०७.७५ | ६,४६,३३४.७० |
| वापरमूल्य | ७६,०१,६९२.९५ | ७४,३७,१४६.०८ |
| साखर कारखाने | ३०,२५,५८७.०० | ३०,२५,५८६.५५ |
| संपादित जमीनीची किंमत जमा | ४,६७,२९,६०५.०० | ४,५८,२७,५१५.०० |
| संयुक्त शेती २०११-१२ व्यवस्थापन खर्च | ३,०८,३२९.०० | ३,०८,३२९.०० |
| इतर किरकोळ/अग्रिम | १४,५००.७३ | २०,२०२.२७ |
| एचबी/वाहन कर्ज वसूली शासनास देय | ३७,०७७.८१ | ३७,०७७.८१ |
| **एकूण** | **५,८१,५५,३००.२४** | **५,७३,०२,१९१.४१** |

-----*-----

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

## ३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे ताळेबंदाचा भाग असलेली अनुसूची

## अनुसूची क्रमांक ४ अ

## चालू दायित्वे - अल्प मुदतीची कर्जे

## कर्जे (अप्रतिभूत)

| | ३१ मार्च २०१६ अखेर (रु) | ३१ मार्च २०१५ अखेर (रु) |
|---|---|---|
| **अल्प मुदतीची कर्जे (अप्रतिभूत). महाराष्ट्र शासनाकडून घेतलेले** | | |
| अ) व्याज आकारण्यात येणारे | ८६२,९१९,६८५ | १,०७२,४१५,६८५ |
| ब) बिन व्याजी | २१६,०७२,००० | २१६,०७२,००० |
| अधिक (+ )वरील कर्जावरील उपर्जित व देय असलेले व्याज (रु.१०७,८९,.९२ लाख कर्जे रक्कम परतफेड करण्यास अगोदरच लागू झालेली आहे. (मागील वर्षी रु. रु.१२८,८४.८७ लाख) | १,१९७,४११,६८९ | १,०८६,८८३,८५७ |
| **एकूण..** | **२,२७६,४०३,३७४** | **२,३७५,३७१,५४२** |

**टिपा:-**

१. महामंडळास दैनंदिन खर्च, व्यवस्थापन खर्च आणि पगार खर्च भागविण्याकरिता सन १९६३ पासून महाराष्ट्र शासनाने अल्प मुदतीचे व्याजी कर्ज परत करणेचे अटीवर दिलेली आहेत. आर्थिक तोटयामुळे कर्जाची आणि व्याजाची रक्कम महाराष्ट्र शासनास परत केली नाहीत. कर्ज आणि व्याज याबाबतची रुजूवात महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेली नाही.

२. मागील वर्ष २०१४-२०१५ शी तुलना करीता शासनाकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम सन २०१५-२०१६ मध्ये रु. २०.९५ कोटीने कमी झाली आहे. कारण २०१५-२०१६ मध्ये महामंडळाने रक्कम रु. १७.२० कोटीचे कर्ज शासनास परत केले आहे. तसेच शासन कर्जाची शासनाकडील नोंदणी पडताळणी करुन त्यानुसार रु. ३.७५ कोटी ही चालू दायित्वे मध्ये दर्शविली आहे.

-----*-----

## अनुसूची क्रमांक ४ ब, क, ड

## ३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे ताळेबंदाचा भाग असलेली अनुसूची

## अनुसूची क्रमांक ४ ब, क, ड

## चालू दायित्वे व तरतूदी

| | ३१ मार्च २०१६ अखेर (रु) | ३१ मार्च २०१५ अखेर (रु) |
|---|---|---|
| **४ब) व्यावसायिक दायित्वे** | - | - |
| **४ क) इतर चालू दायित्वे अ) कर्मचारी कल्याण खर्च** | | |
| १. वेतन व मजूरी | ४,०३२,१८१ | ४,६३४,४६५ |
| २. अदत्त वेतन व मजूरी | ४,७०३,८०७ | ९,३१९,५२५ |
| ३. बोनस | ७,६३१,८४४ | १४,७२०,८०६ |
| ४. भविष्य निर्वाह निधी कर्मचारी | ३३६,५९२ | ४०८,८२८ |
| ५. भविष्य निर्वाह निधी व्यवस्थापन अंशदान | ११९,५९४ | २८८,४२० |
| **ब) इतर किरकोळ दायित्वे** | २,३८९,८४७ | ७,१५८,६१३ |
| **क) शासकीय देणी व कर** | | |
| १. पट्टी व कर | १८,५४९,७६८ | १९,६७९,६५७ |
| २. व्हॅट/व्यवसाय कर | ३२०,६८० | १,२४५,०३७ |
| ३. विज शुल्क | १७१,२४४ | २६८,३४२ |
| **एकूण--** | **३८,२५५,५५७** | **५७,७२३,६९३** |
| **४ ड) तरतूदी** १) कृषि आयकरासाठी | ३२,८१६,४९८ | ३२,८१६,४९८ |
| २) सेवा उपदानासाठी | ५६,१९२,५१५ | ६५,२४४,५०४ |
| ३) घसाऱ्यासाठी | २,९६६,५५० | २,९११,६४४ |
| ४) आयकर | १२,५५३,०५२ | ११,५४९,५१३ |
| **एकूण--** | **१०४,५२८,६१५** | **११२,५२२,१५९** |

अ) दि. ३१/०३/२०१६ रोजीचे ताळेबंदात दिसत असलेल्या धनको, मिळालेल्या आगाउ रक्कमा आणि इतर जमा शिलकी धनको कडून रुजवात पत्रके मिळविलेली नाहीत. सदर जमा शिल्लकी रक्कमांची प्रलंबित पडताळणी आणि मुख्य कार्यालय, मळे व साखर कारखा-ने यांचेमधील शिलकी रकमांचे समायोजन झालेली नाही. पडताळणी न झाल्यामुळे त्याचा वित्तीय तक्त्यांवरील परिणाम सांगता येऊ शकत नाही. विशेष कारण म्हणजे सदरची बाब हि फार वर्षापासूनची आहे.

ब) अदत्त वेतन व मजूरी यामध्ये तीन वर्षापेक्षा जास्त काळ देय असलेल्या रू. ३४,६८,४८५/- (मागील वर्षी रू. ४१,०५,६२५) रकमेचा समावेश आहे.

क ) सन २०१५-२०६ या अहवाल वर्षात रू. ४२.९८ लाखाची ( मागील वर्षी म्हणजेच दिनांक ०१/०३/२०१४ ते ३१/३/२०१५ रू. ४०.५२ लाख) कार्यालयीन इमारतीच्या मिळणा-या उत्पन्नावरच्या आयकराची तरतूद करण्यात आलेली आहे. वित्तीय वर्ष २०१५-२०१६ म्हणजेच (करनिर्धारण वर्ष २०१६-२०१७) मधील प्रत्यक्ष आयकराचे दायित्व विचारात घेऊन तरतूद केलेली आहे. याबाबत आयकर पडताळणी आदेश किंवा वादग्रस्त बाब प्रलंबित नाहीत.

ड) महामंळास महाराष्ट्र कृषी आयकर कायदा मधील तरतूदीनुसार रक्कम रु.३२८.१६ लाख कृषी आयकर राज्य शासनास देय आहे. महामंडळाने सदर कृषी आयकराची रक्कम माफ करणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनास पाठविला आहे. माफी बाबत राज्य शासानाकडून रुजूवात अद्याप मिळालेली नाही.

इ ) कर्मचा-यांना लाभ-

* उपभोग न घेतलेल्या रजेबाबत रजा रोखीकरणाचे दायित्व हे लेख्यांमध्ये रोखीचे तत्वावर केलेले आहे.

* भविष्य निर्वाह निधी आणि कुटुंब निवृत्ती वेतन निधीची महामंडळाच्या हिश्याची तरतूद केली असून त्याच्या रकमा संबंधितांना अदा केलेल्या आहेत.

फ.) एकूण तरतूद रक्कम यामध्ये एक वर्षाखालील रु. १,११,७४,४९६/- , एक वर्षापेक्षा अधिक परंतु तीन वर्षापेक्षा कमी रक्कम रु. १,४४,४२,८९८/-, आणि तीन वर्षापेक्षा अधिक रक्कम रु. ७,८९,११,२२१/- रकमेचा समावेश आहे. सदर तरतुदी या महामंडळाचे व्यवसायाचे स्वरुपानूसार चालू दायित्वे आणि चालू नसलेली दायित्वे असे वर्गीकरण केलेले नाही.

**ग ) इतर चालू दायित्वे मध्ये समाविष्ट असलेला तपशील खालीलप्रमाणे-**

| तपशिल | २०१५-२०१६ | २०१४-२०१५ |
|---|---|---|
| प्रवास खर्च इतर | ५७,१०२.०० | ३७,१६७.०० |
| इंधन व ऑईल वापरलेले | २,५००.०० | ६६९.०० |
| वैद्यकीय बिले | ११,७१७.०० | २२,५४८.०० |
| कर्मचारी सह पतसंस्था | १,०२,४५४.०० | १,०२,३३६.०० |
| पुस्तके आणि वर्तमानपत्रे | २,५३८.०० | २,००४.०० |
| दूरध्वनी | २०,९२२.०० | १६,८८८.०० |
| टपाल व टेलि. | २४५.०० | ८९७.०० |
| आतिथ्य / अतिथीगृह | ७,९९२.०० | ४,४३२.०० |
| किरकोळ खर्च | ८,९९३.०० | ३६,७९,४७३.०० |
| बँक चार्जेस | ८५९.०० | २०५.०० |
| कायदे विषयक फी | २४०.०० | १२,०७,५४४.०० |
| दुरूस्ती व निगा | ३,२२०.०० | ८०.०० |
| अदा केलेल्या खर्चाची तरतूद | २०,७१,७८५.०० | १९,८१,३७०.०० |
| लेखापरीक्षण फी | ७५,०००.०० | ७५,०००.०० |
| भ. नि. ट्रस्ट लेखापरीक्षण फी | १५,०००.०० | १९,०००.०० |
| आयकर आणि टी.डी.एस. विवरण पत्र | ९,२८०.०० | ९,०००.०० |
| **एकूण** | **२३,८९,८४७.००** | **७१,५८,६१३.००** |

-----*-----

**अनुसूची क्रमांक ५**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

## (महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)

## ३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे ताळेबंदाचा भाग असलेली अनुसूची

## अनुसूची क्रमांक ५ बाब क्रमांक २ मत्ता (१ ) (अ) (१)

## चालू नसलेली स्थिरमत्ता

(आकडे रुपयात)

| | एकूण गट | | | | | घसारा | | | | निव्वळ गट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | मत्ताचा तपशिल | आरंभीची शिल्लक ०१-०४-२०१५ रोजी | या वर्षामध्ये भर (+)/समायोजान २०१५-२०१६ | या वर्षामध्ये वजावट | ३१ मार्च २०१६ असल्याप्रमाणे शिल्लक | ३१ मार्च २०१५ पर्यंत | २०१५-२०१६ या वर्षामध्ये समायोजन | २०१५-२०१६ या वर्षामध्ये वजावट | एकूण शिल्लक ३१ मार्च २०१६ | ३१ मार्च २०१६ रोजी असल्या प्रमाणे | ३१ मार्च २०१५ रोजी असल्या प्रमाणे |
| | १ | २ | ३ (+) | ४ (-) | ५ (२+३-४) | ६ | ७(+) | ८ (-) | ९ | १० | ११ |
| १ | भू-विकासासह भूमी | २३,६४२,३४२ | - | - | २३,६४२,३४२ | - | - | - | - | २३,६४२,३४२ | २३,६४२,३४२ |
| २ | जलसिंचन-विहीरी | १९,२५४,७९३ | - | ४,५२५,१५० | १४,७२९,६४३ | ६,३८९,६४१ | २६४,७२० | १,४८४,०३७ | ५,१७०,३२४ | ९,५५९,३१९ | १२,८६५,१५२ |
| ३ | रस्ते | १२८,२२३ | - | - | १२८,२२३ | ७५,५८७ | २,०६५ | - | ७७,६५२ | ५०,५७१ | ५२,६३६ |
| ४ | इमारती व कुंपणे | ४४,२७९,७२५ | - | २,७१९,७१६ | ४१,५६०,००९ | २५,७९८,७८६ | ६८२,११८ | १,८९८,३४१ | २४,५८२,५६३ | १६,९७७,४४६ | १८,४८०,९३९ |
| ५ | लिफ्ट पंप व यंत्रसामुग्री | १,९८८,१७७ | - | ७४६,३८० | १,२४१,७९७ | १,८२६,५४० | २,६८३ | ६८०,९५३ | १,१४८,२७० | ९३,५२७ | १६१,६३७ |
| ६ | फर्निचर व कार्यालयीन सामुग्री | ३,७११,३२० | १६१,८९८ | ३०१,३७८ | ३,५७१,८४० | ३,३४७,७५७ | ८०,४०९ | २७२,६६१ | ३,१५५,५०५ | ४१६,३३५ | ३६३,५६३ |
| ७ | प्रयोगशाळा, व्हेंटरनरी व दुग्धशाळा सामुग्री | ८८५ | - | - | ८८५ | ८४१ | - | - | ८४१ | ४४ | ४४ |
| ८ | वजन काटे | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ९ | इतर यंत्रसामुग्री (डिझेल टाकी) | २०८,५२५ | - | ७३,०८८ | १३५,४३७ | १९८,११० | - | ६९,४४५ | १२८,६६५ | ६,७७२ | १०,४१५ |
| १० | ट्रॅक्टर्स व ट्रेलर्स | १,२२७,५१५ | - | १,२२७,५१५ | - | १,१६६,१४१ | - | १,१६६,१४१ | - | - | ६१,३७४ |
| ११ | वाहने | ७,१२६,४८८ | - | ९५५,३४४ | ६,१७१,१४४ | ४,७८२,४७२ | २१७,३८५ | ९२१,५०० | ४,०७८,३५७ | २,०९२,७८७ | २,३४४,०१६ |
| १२ | ट्रॅक्टर्स अवजारे व सुटे भाग | १६,१५८ | - | ११,९०७ | ४,२५१ | १३,२१६ | २०२ | ११,०४५ | २,३७३ | १,८७८ | २,९४१ |
| १३ | बैलगाडया | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | एकूण | १०१,५८४,१५१ | १६१,८९८ | १०,५६०,४७८ | ९१,१८५,५७१ | ४३,५९९,०९१ | १,२४९,५८२ | ६,५०४,१२३ | ३८,३४४,५५० | ५२,८४१,०२१ | ५७,९८५,०५८ |
| | मागील वर्षी एकूण | १४७,५२६,९८९ | १,४४९,०११ | ४७,३९१,८५० | १०१,५८४,१५० | ८४,०३६,५०० | २,०११,७३३ | ४२,४४९,१४२ | ४३,५९९,०९१ | ५७,९८५,०५८ | ५७,९८५,०५८ |
| | अधिक : वादग्रस्त मत्तावरील घसारा | | | | | | ५४,९०६ | | | | |
| | एकूण घसारा | | | | | | १,३०४,४८८ | | | | |

**टिपाः-**

अ ) स्थिर मत्ता ही एकूण किंमत मधून एकूण संचित घसारा वजा जाता निव्वळ दर्शवित आहे. किंमतीमध्ये खरेदी किंमत व ज्या उद्देशाकरीता वापरावयाची आहे, त्या चालू स्थितीत आणणेसाठी केलेला सर्व प्रत्यक्ष खर्च तसेच त्यासंबंधी जकात आणि ना परतावा कर याचा समावेश आहे. चालू आर्थिक वर्षात स्थिरमत्तेचे पुर्नमूल्यांकन केलेले नाही.

ब) स्थिर मत्तेच्या अनुसूचीत जमिनी व बिगर शेतकी जमिनीवरील इमारती रूपये ३४,१४,१४८/- आणि इतर मत्तां रूपये १,१२,०६९/- (एकूण रूपये ३५,२६,२१७/-) समावेश नाही कारण त्याची मालकी हक्का विषयीचे हक्क आणि व्यवहार पूर्ण झालेले नाहीत. सदरील मत्ता महामंडळाच्या ताब्यात असून ती वापरात आहे.

तथापि नफा-तोटा पत्रकामध्ये दर्शविलेला रू.५४,९०६/- घसारा हा वर नमूद केलेल्या मत्तांवर आकारलेला आहे. संचित घसारा हा चालू दायित्व या शिर्षकाखाली दाखविलेला आहे. रूपये ३५,२६,२१७/- किंमती बाबतचा निर्णय व्हावयाचा असून त्यापोटी दिलेला एकूण अग्रिम रूपये ३१,९९,५३७/- अद्याप समायोजित व्हावयाचा बाकी आहे. (कृपया अनुसूची ३ अ, ब, क ,ड टिप (ग) पहावी).

क) सदाशिवनगर मळ्याचा निवाडा अद्यापी जाहीर न झाल्यामुळे त्या मळयावरील जमिनीचे (त्यावरील पक्क्या व कच्च्या बांधकामासह) मूल्य उपलब्ध नाही. तथापि , महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार वरील मळयाबाबत (सदाशिवनगर) महामंडळाने माजी खंडक-यांना रूपये ७,६३,७९७/- एवढी रक्कम तदर्थ खंड म्हणून अदा केलेली आहे. सदरील रक्कम निवाडयापोटी समायोजित करावयाची असल्याने सदर रक्कम " चालू भांडवली कामे " या शिर्षकाखाली मत्तापोटी अग्रिम म्हणूल दाखविलेली आहे.

ड.) अनूसूची ३ अ ब क ड मुद्या क्र. ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे एका मळयावरील ३४०५ एकर जमिनीपैकी ६८१ एकर जमीन माजी खंडक-यांना प्रदान केलेली आहे. त्याची निवाडा रक्कम नसल्यामुळे त्याचे मूल्य ठरविता येत नाही. ११ एकर जमिन शासनाने संपादन केलेली आहे.

इ ) इतर १३ मळयांच्या (सदाशिवनगर मळा सोडून) ताब्यात असलेल्या जमिनी बाबतची स्थिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | एकर |
|---|---|---|
| १ | **ताब्यात व वापरात असलेली** | **४३१२१** |
| २ | **एकूण २६,०६६.६९ एकर जमीन खंडकरी यांना वाटप करावयाची आहे. दि. ३१.०३.२०१६ पर्यंत वाटप झालेले एकूण जमीन (टिपणी य पहा)** | **२२५६३** |
| ३ | **माजी खंडकऱ्यांना देण्यात आलेली** | **१३,५८०** |
| ४ | **अतिक्रमण झालेले क्षेत्र** | **१२१५** |
| ५ | **शासनाने संपादन केलेली** | **१,४८०** |
| ६ | **महामंडळाने परत केलेली** | **१११** |
| ७ | **विकलेली** | **१४** |
| ८ | **जिल्हाधिकारी यांचेकडील कमाल जमिन धारणा कायद्यानुसार कमी केलेली** | **१४८** |
| | **एकूण :-** | **८२,२३२** |

फ) जमिनीची किंमत /मूल्य, अध्यादेश इ. या संबंधी शासन आदेश किंवा अंतिम निर्णय झालेला नसल्यामुळे वरील परिच्छेदात दाखविलेली मालमत्ता ही ताळेबंदामध्ये दाखविलेली असली तरी त्यामध्ये बदल होण्याची शक्यता आहे व त्यानुसार त्याचा परिणाम महामंडळाच्या नफा-तोटा पत्रकावर होणार आहे.

ग) १३ मळयावरील एकूण ८२,२३२ एकर जमिनीपैकी ४०४ एकर जमिनीवर अतिक्रमणे झालेली असून सदरील प्रकरणे कोर्टामध्ये प्रलंबीत आहेत.

ह). ताळेबंदामध्ये दर्शविलेले जमिनीचे मूल्य हे निरनिराळे अधिकारात संपादित केलेल्या जमिनीचे मूल्य विचारात न घेता दर्शविलेले आहे.

य) महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१७/२००३ अन्वये दुरुस्त करण्यात आला आहे. या दुरुस्तीमुळे ज्या माजी खंडक-यांनी त्यांच्या जमिनी साखर उद्योगास खंडाने दिल्या होत्या आणि ज्या जमिनी यानंतर महामंडळाकडे देण्यात आल्या आहेत अशा खंडक-यांना आता एका कमाल मर्यादेपर्यंत जमिनी परत करणे हे अधिकृत झाले आहे. महाराष्ट्र अधिनियम क्र.१७/२००३ च्या घटनात्मक कायदेशीपणाबद्दल प्रातिनिधीक कामगार संघटनांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका क्रमांक २९७८/२००३ ची दाखल करून हरकत घेतली होती. मे. उच्च न्यायालयाने सदरची याचिका दिनांक २३/९/२००५ च्या निर्णयाद्वारे रद्द केली. प्रातिनिधीक कामगार संघटनांना मे. उच्च न्यायालयाचा सदरचा निर्णय मान्य न झाल्यामुळे त्यांनी मे. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे अपिल क्रमांक ४६२/२००८ चे दाखल केले होते. मे. सर्वोच्च न्यायालयाने सदरचे अपिल दिनांक ३० ऑगस्ट २०११ चे निर्णयान्वये रद्द केले आहे.

वरील निर्णय विचारात घेता माजी खंडक-यांना महामंडळाच्या ताब्यात असलेल्या जमिनी एका कमाल मर्यादेपर्यंत परत करणेचे अधिकृत झाले असून अशा माजी खंडक-यांना जमीन वाटप करण्याच्या हेतूने राज्य सरकारने तेरा मळयाकरिता वेगवेगळया तारखेचे शासन निर्णय काढलेले आहेत. महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) कायदा कलम २८-१ अअ (३) मधील तरतूदीनुसार शासन जमीन वाटप करीत आहे. दिनांक ३१/०३/२०१६ पर्यंत २२५६३.०९ एकर क्षेत्राचे खंडक-यांना प्रत्यक्ष वाटप झाले आहे. तथापि, या प्रक्रियेत प्रत्यक्ष वाटप झालेले जमिनीचे एकूण क्षेत्र हे जमीन वाटपाची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतरच उपलब्ध होईल. ताळेबंदात दर्शविलेली जमीन किंमत ही खंडक-यांचे जमीन व्यतिरिक्त असल्याने जमीनीत झालेल्या बदलामुळे त्याचा काहिही परिणाम होत नाही.

ज) कलम एएस-२८ प्रमाणे वापरण्याजोगी नसलेली मत्ता रु. ८,६९४/- (मागील वर्षी रु. २,३६,४११/-) आहे.

ह) स्थिर मत्तेच्या अनुसूचीत खालील मत्तांबाबत मालकी हक्काबाबत आणि व्यवहार पूर्ण झालेला नसल्याने समावेश केलेला नाही. सदरील मत्ता महामंडळाच्या ताब्यात असून वापरात आहे.

| तपशिल | रूपये |
|---|---|
| **जमिनी व बिगर शेतकी जमिनीवरील इमारती** | **३४,१४,१४८-००** |
| **इतर मत्ता** | **१,१२,०६९-००** |
| **एकूण :-** | **३५,२६,२१७-००** |

तथापि नफा-तोटा पत्रकामध्ये दर्शविलेला रू.५४,९०६/- घसारा हा वर नमूद केलेल्या मत्तांवर आकारलेला आहे. संचित घसारा हा चालू दायित्व या शिर्षकाखाली दाखविलेला आहे. रूपये ३५,२६,२१७/- किंमती बाबतचा निर्णय व्हावयाचा असून त्यापोटी एकूण दिलेला अग्रिम रूपये ३१,९९,५३७/- समायोजित केलेला नाही.

-----*-----

**अनुसूची क्रमांक ५ अ**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

**३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे ताळेबंदाचा भाग असलेली अनुसूची**

**अनुसूची क्रमांक ५ अ**

**चालू नसलेली स्थिरमत्ता**

| | ३१ मार्च २०१६ अखेर | ३१ मार्च २०१५अखेर |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| १. दृश्यं मत्तांवरील वर्षाकरीता घसारा आणि तरतूदी | १,२४९,५८२ | २,०११,७३३ |
| २. वादग्रस्त मत्तांवरील घसारा (अनुसूची ५ नोट नं. ह ) पहा | ५४,९०६ | ५४,९०६ |
| **एकूण--** | **१,३०४,४८८** | **२,०६६,६३९** |

-----*-----

**अनुसूची क्रमांक ६**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

**३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे ताळेबंदाचा भाग असलेली अनुसूची**

**अनुसूची क्रमांक ६ बाब क्रमांक २-मत्ता ( १ )(अ ) ( ३ )**

**चालू नसलेली मत्ता - चालू भांडवली कामे**

| | ३१ मार्च २०१६ अखेर | ३१ मार्च २०१५अखेर |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| चालू भांडवली कामे | - | - |
| मालमत्तेपोटी दिलेला अग्रिम | ५,३४०,८५४ | ५,३४०,८५४ |
| **एकूण ..** | **५,३४०,८५४** | **५,३४०,८५४** |

**टिप :-**

मत्ता खरेदी पोटी दिलेला अग्रिम रु. ५३,४०,८५४/- हा तीन वर्षापेक्षा अधिक वर्षापूर्वीचा आहे. प्रमाणाभूत तज्ञांकडून सदर जमिनीची किंमत/मुल्य व निवाडा इ..बाबत अंतिम निर्णय झालेला नाही.

-----*-----

**अनुसूची क्रमांक ७**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

## ३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे ताळेबंदाचा भाग असलेली अनुसूची

## अनुसूची क्रमांक ७ बाब क्र. २ वित्त (२) (अ)

## चालू नसलेली गुंतवणूकी

| | ३१ मार्च २०१६ अखेर | ३१ मार्च २०१५ अखेर |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| **गुंतवणूकी (परिव्यय मूल्यानुसार)** | | |
| **अ) शासकीय बंद पत्रामधील इतर गुंतवणूकी (ामूद ा केलेल्या)** | | |
| १) राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे (वेगवेगळया दर्शनी किंमतीची प्रमाणपत्रे) | ३१,४१७ | ३३,२३७ |
| **ब) व्यावसायिक गुंतवणूकी (नमूद न केलेल्या)** | | |
| १) श्री शुंकर स.सा.का.लि.सदाशिवनगरचे १,२०० पुर्ण पणे भरणा केलेले प्रत्येक ५०००/- रुपयांचे सममूल्य भाग | ६,०००,००० | ६,०००,००० |
| २) गंगापूर स.सा.का.लि.गंगापूरचे ५०० पूर्णपणे भरणा केलेले प्रत्येकी १००० रुपयांचे सममूल्य भाग | ५००,००० | ५००,००० |
| ३) श्री छत्रपती स.सा.का.लि., भवानीनगरचे १. पूर्णपणे भरणा केलेले प्रत्येकी ३०००/- रुपयांचे सममूल्य भाग | ३,००० | ३,००० |
| ४) सोमेश्वर स.सा.का.लि. १३३ पूर्णपणे भरणा केलेले प्रत्येकी ५०००/- रुपयोचे सममूल्य भाग | ६६५,००० | ६६५,००० |
| ५) माळेगांव स.सा.का.लि. १५३७ पूर्णपणे भरणा केलेले प्रत्येकी ५०००/- रुपयांचे सममूल्य भाग | ७,६८५,००० | ७,८५०,००० |
| ६) कोपरगांव स.सा.का.लि.एक पूर्णपणे भरणा केलेले प्रत्येकी५०००/- रुपयांचे सममूल्य भाग | ५,००० | ५,००० |
| ७) मे. मुळा प्रवरा विद्युत सहकारी सोसायटी लि., श्रीरामपूरचे १७५२ पूर्णपणे भरणा केलेले प्रत्येकी २५/- रु. चे सममूल्य भाग (मागील वर्षी १७५२) | ४,२०० | ४,२०० |
| ८) विविध कार्यकारी सोसायटी कळंबचे दोन पूर्णपणे भरणा केलेले प्रत्येकी रु. १०/- चे सममूल्य भाग | २० | २० |
| **क) इतर** | | |
| ८.५ टक्के दराशी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची ऋणपत्रे (ताळेबंदावर सही करण्याच्या तारखेपर्यंत म. रा. वि.म. कडून ऋणपत्रे मिळालेली नाहीत) | ४,८०० | ४,८०० |
| **एकूण ..** | **१४,८९८,४३७** | **१५,०६५,२५७** |
| एकंदरीत नमूद न केलेल्या गुंतवणूकी परिव्यय मूल्यानुसार | **१४,८९८,४३७** | **१५,०६५,२५७** |

**टिपा :-**

१. व्यवस्थापनाचे मते नमूद न केलेल्या गुंतवणूकी या गुंतवणूक केलेल्या कंपनीच्या व्यवस्थापनात बदल झाले असले तरी त्या वसूल होणा-या आहेत.

२. गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकीतील घट निश्चित करता येत नसल्याने गुंतवणूकीच्या किंमतीमधील घट बाबत तरतूद केलेली नाही.

३. गुंतवणूक रक्कम ही प्रत्यक्ष गुंतविलेल्या किंमती इतकी दर्शविली आहे. व्यवस्थापनाच्या मतानुसार गुंतवणूकीचे मूल्यात होणारी घटीची तरतूद ही तात्पुरत्या स्वरूपाची नसेल तरच केली जावी असे आहे.

४. सन २०१५-२०१६ मध्ये माळेगाव स.सा.का.लि. यांनी भागाची रक्कम रू. १,६५,०००/- परत केले आहेत. तसेच एन एस सी रू. १,८२०/- निर्लेखित केली आहे.

५. मुळा प्रवरा इलेक्ट्रीक सहकारी सोसायटी लि., श्रीरामपूर हि महाराष्ट्र राज्य विद्यूत पुरवठा कंपनी लि. ने ताब्यात घेतली आहे. तपशीला अभावी गुंतवणूकीबाबतची नुकसान भरपाई लेख्यामध्ये घेतलेली नाही.

६. राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे महामंडळाचे ताब्यात नाहीत. त्यामधील घट बाबतची तरतूद केलेली नाही.

--------*--------

**अनुसूची क्रमांक ८**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

## ३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे ताळेबंदाचा भाग असलेली अनुसूची

**अनुसूची क्रमांक ८, बाब क्रमांक २ मत्ता (१ ) (य)**

**इतर चालू नसलेली मत्ता**

| | ३१ मार्च २०१६ अखेर | ३१ मार्च २०१५ अखेर |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| भविष्य कालीन महसूली खर्चाचा खर्ची न टाकलेला हिस्सा | | |
| १) उपसा जलसिंचन योजना | ५,१६३,३८२ | ५,१६३,३८२ |
| वजा-शंकास्पद समजलेले | ५,१६३,३८२ | ५,१६३,३८२ |
| **एकूण ..** | - | - |

--------*--------

**अनुसूची क्रमांक ९**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

## ३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे ताळेबंदाचा भाग असलेली अनुसूची

**अनुसूची क्रमांक ९ बाब क्रमांक २ मत्ता (२)(ब)**

**वस्तुसूची**

| | ३१ मार्च २०१६ अखेर | ३१ मार्च २०१५ अखेर |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| **वस्तुसूची** | | |
| (बाब क्रमांक ४ सोडून व्यवस्थापनाने प्रमाणित व मूल्यनिर्धारित केल्याप्रमाणे) | | |
| १) परिव्यय मूल्यानुसार सामान व सुटे भाग | ८,३२२ | ७,७४७ |
| २) परिव्यय मूल्यानुसार रास्त भाव दुकानातील वस्तूंचा साठा | - | २०८,३४६ |
| **३) उभी पिके-** | | |
| वृक्षशेती, फलोद्यान परिव्यय मूल्य वजा विक्रीची किंमती. | ३९,६९५,३७१ | ४१,८१६,९५४ |
| **एकूण ..** | **३९,७०३,६९३** | **४२,०३३,०४७** |

**टिपा :-**

अ) वस्तूसूचीमध्ये फक्त इंधन व ऑईल असून त्यामुळे त्याचा संख्यात्मक तपशील दाखविणे शक्य होत नाही.

ब) सामान, सुटे भाग, या साठयांचे मुल्यांकन हे प्रत्यक्ष किंमत किंवा निव्वळ मिळणारी किंमत यापैकी जी कमी असेल त्याप्रमाणे केले आहे.

क) वृक्ष शेती आणि फलोद्यान यांचे मुल्यांकन हे प्रत्यक्ष झालेल्या खर्चा मधून सन २०१५-२०१६ मध्ये विक्री पासून मिळालेली रक्कम वजा जाता दर्शविलेले आहे.

--------*--------

**अनुसूची क्रमांक १०**

# महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

## ३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे ताळेबंदाचा भाग असलेली अनुसूची
## अनुसूची क्रमांक १०, बाब क्रमांक २ मत्ता (२) (क)
## व्यापारी येणे

| | ३१ मार्च २०१६ अखेर | | ३१ मार्च २०१५ अखेर | |
|---|---|---|---|---|
| | रुपये | | रुपये | |
| **किरकोळ ऋणको**<br>(अप्रतिभूत व उचित) समजण्यात आलेले याशिवाय वेगळे म्हटलेले असेल तर) | | | | |
| १) ६ महिन्यांपेक्षा कमी काम थकलेल्या अदत्त रकमा | | ४०,४६७,८४३ | | १४,८२१,५२५ |
| २) ६ महिन्यांपेक्षाअधिक काळ थकलेल्या अदत्त रकमा | | | | |
| (अ) उचित समजलेले | ३६१,४१४,४५३ | | २६३,२७९,५४१ | |
| (ब) शंकास्पद समजलेले | १०१,३५६,९७७ | | १०१,३५६,९७७ | |
| | ४६२,७७१,४३० | | ३६४,६३६,५१८ | |
| वजा : शंकास्पद कर्जासाठी तरतूद | १०१,३५६,९७७ | | १०१,३५६,९७७ | |
| | | ३६१,४१४,४५३ | | २६३,२७९,५४१ |
| **एकूण ..** | | **४०१,८८२,२९६** | | **२७८,१०१,०६६** |

**टिपा :-**

